म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक
पुस्तकाचें नांव
सन

কা ০৫
৭২০/৭

# केकासार

मराठीसहावी व इंग्रजीपांचवीइयत्ता
शिकणारांच्या उपयोगाकरितां
मयूरकविकृत केकावलि,शब्दकोश व वर-
सांगितलेल्या इयत्तांस लागणाऱ्या कवितांचा

## अन्वयार्थ

हें पुस्तक

रा.रा.गणेशविष्णुगद्रेयांनीतयारकेलें
तें
बाळकृष्ण गोविंद बोरवणकर
यांनीं

"जगदीश्वर" छापखान्यांत छापविलें
सन् १८८३ इ.
किमतसहाआणे
हें पुस्तक सन् १८६७ चा आक्ट २५ प्र
माणें रजिष्टरकेलें आहे.

## ॥ केका ॥

सदाश्रितपदा सदाशिवमनोविनोदास्पदा ॥
स्वदास वश मानसा कलिमलांतका कामदा ॥
वदान्यजन सद्गुरो प्रशमितामितासन्मदा ॥
गदारिदर नंदकांबुजधरा नमस्तेसदा १
पदाब्जरज जें तुझें सकलपावना धारतें ॥
घाचलहि तारिले बहुतु वांचिराधारतें ॥
ऽजामिळ अघासुर व्रजवधू वकी पिंगळा ॥
शांगति दिली उरे न तृण भेटतां विंगळा २
ड्या बहुत शोधिलें अघनिधी पदाच्या रजें ॥
तें अनृत वर्णिती बुधजनीं सदाचारजें ॥
सें सतत ऐकतें सतत बोलतें मीच तें ॥
माण न म्हणों जरी उचित माझिया नीच तें ३
साचि उरलों कसा पतित मी नसें काय कीं ॥
पाचि सरली असें हि न घडे जगन्नायकीं ॥
सेन दिसलों कसा नयन सर्वसाक्षी रवी ॥
षाद धरिला म्हणों न सुरभी विपक्षीरवी ४

प्रजावनकरावया वसविलें नरवाग्रीं धरा ॥
सलील तैंमंदराख्यहि नगस्वपृष्ठीं धरा ॥
वराहतनु घेउनी उचलिलीरदाग्रें धरा ॥
सुदुर्धर तुम्हांकसा पतित ह्मानकां उद्धरा ५
नतावन धृतव्रत ज्वलन तूंचि बाधावनीं ॥
पदप्रणत संकटीं प्रजव तूंचि बाधावनीं ॥
दया प्रकट दाखवी कवणसांग त्या वारणीं ॥
सतिव्यसन वारणीं जय जयार्थत्या वारणीं ६
सुपात्र नरमाहिय द्रुतिसुखवास दारापरी ॥
असा प्रभुहि सेवका भजसिखास दारापरी ॥
प्रियाकुचतटीं जिहीं न बहु वार पत्रावळी ॥
तिहीं अमित काढिल्या नृप मखांत पत्रावळी
नपावसिम्हणोनि मी म्हणतसें तुला आळसी ॥
वरीन असदुक्ति हे रविसखो स्थिता आळसी ॥
असंख्य जन तर्पिले क्षुधित एकला जं मनीं ॥
चुकेल तरि त्यासदे परि वदान्य लाजे मनीं ८

अगाप्रणतवत्सलाम्हणतित्याजनां पावलां ॥
म्हणोनतुमच्याचमी स्मरतसें सदापावलां ॥
करूंबरि कृपा हरूंव्यसनदीनहा तापला ॥
असेंमनिं धरारवरा भरवसा मला आपला ९
मलानिररवितां भवभ्चरण कन्यका आपगा ॥
म्हणे अगइ ऐकिलें हिनकधीं असें पापगा ॥
करश्रवणिं ठेविते नुघडि नेत्रघे भीतिला ॥
नघालिन भिडेस मी जरिहि कार्य लो भीतिला १०
सदैवनमितां जरी पद ललाट केलें किणें ॥
नसे इतर तारिता मजभवत्पदाञ्जाविणें ॥
नताकरुन मुक्तही म्हणासिमी बुडालों रिणें ॥
अशातुजनजो भजे मनुजधिक् तयाचें जिणें ११
पटुत्वसकलेंद्रियीं मनुजता सुवंशींजनीं ॥
द्विजत्वहि दिलें भलें बहु अलभ्यजेंकींजनीं ॥
यशश्रवणकीर्तनीं रुचि दिली तरी हावरा १२
म्हणे अधिक याचकीं अखिलयाचकीं हावरा ॥

असें नम्हण सीलतूं वरदवत्सल श्रीकरा ॥
परंतु मज भासलें म्हणुनि जोडितों मी करा ॥
दिल्हें बहु भलें खरें परि गमे कृपाब्धंगती ॥
अलंकृतिमतीसती मनि झुरे न जों संगती १३
करालपुरती दया तरि असो दिल्हें पावलें ॥
परंतु हरि एकदां त्वरित दारवबापावलें ॥
प्रसाद करणें मनीं जरि नसेल हें आवरा ॥
जया बहुत यास द्या मज कशास मी हावरा १४
दिलें फिरुन घेतलें अशि अकीर्ति लोकीं नहो ॥
सुनिर्मळ तुझीं पदें कधिं तरी विलोकीं नहो ॥
निजप्रियजनाकडे तरि हि देह वालाजसी ॥
पडेल समजाविसी तसि करोत कां लाजसी १५
अज्ञानि पट धृष्ट मी प्रभुवरासि कां लाजसी ।
म्हणे तुज नसो तरी विकृति भाविकां लाजसी ।
परंतु अपराध हा गुरु म्हणोनि शिक्षा करीं ।
असेचि धरिली नयच्युतदमार्थ दीक्षा करीं १६

सदैव अपराध हे रचितसें असे कोटिगा ॥
स्वयें हि कथितों नसे तिळहि लाज मी कोटिगा ॥
अजांड शत कोटिजा उदरिं सर्वदा नांदवा ॥
न त्यांत अवकाशया स्थळ दिल्हें न दां कांदवा १७
तुझ्या जिरविले बहु मण तमं तु पोटें पण ॥
त्यजी मदपराध हे मजकडे चिरवोटे पण ॥
स्वाग्नि जठरीं अति क्षुधित त्यास हें अन्नया ॥
वितृष्ण करितीश्रितां तुमचिया दयासन्नया १८
न होय कवणा हितें तुमचिया चिलीलालसें ॥
पदें चरित दाविजे त्रिजगदर्क लीलालसें ॥
मदुद्धरण मात्र कां जड तुम्हां दिसे वारिती ॥
स्वकव्यसन मर्त्य हीन करितीच सेवा रिती १९
दयाब्दवळसील तूं तरिन चालकां सेवकां ॥
उणे किमपि भाविकां उवगसील तूं देवकां ॥
अनन्यगतिका जना निरखितां चि सोपद्रवा ॥
तुझें चि करुणार्णवा मन धरी उमोपद्रवा २०

कळीकरिसुनिर्मळींपरमउग्रदावानळीं ॥
तयांत अविशुद्धमीशलभजेविदावानळीं ॥
म्रणार्त पशफन्ध्याशिरावरिबनींउभेकाकसे ॥
स्मरादिरिपुमन्मनींअहिनकाळभेकाकसे २१
तरेन तुमच्यावळें भवमहा नदीनाविका ॥
तुम्हींचमग आतरास्तवमलासुदीनाविका ॥
असेविदितयासहीमजसदाश्रमींचाकरा ॥
दयागुणपहास बेंमजसदाश्रमीचाकरा २२
घनापरिजनाघरींतुमचियाउणेंकायसें ॥
नलाभमणिहेमभूपतिसजोडिल्या आयसें ॥
परिमभुहिसंग्रहींसकलवस्तुलाठेविती ॥
गुणानम्हणतांउणा अधिक आदरें सेविती २३
दिसेम्हणुनिशाश्वत प्रकृतिरंकमीकायहो ॥
प्रसन्नतुमचावरेंमजवरीप्रभोपायहो ॥
क्षणत्यजुनिइंदिराथृहदुरोजसंगाधरा ॥
शिरीपदमिळोसरवासमसुशीलगंगाधरा २४

प्रभुस्तुतिनठाउकीपरितिच्यामह्लाकामुका ॥
मलाकृपणमारितोवहुसकामह्लाकामुका ॥
म्हणामनिंअसेंकसेंप्रथमनीटयेलेंकरा ॥
हळूहळुपदुस्वयेंसुपथिंलाविंयेलेंकरा २५
जनींतरिअसेंअसेशिशुहिजेंमुखेंवर्णवी ॥
पितापिउनितेंभुलेमधुरतासुखेंवर्णवी ॥
म्नाजरिनयेंगुरूक्तहिम्हणेकदुमायशा ॥
दयानिधितुम्हापुढेंजनकथाअशाकायशा २६
अतर्क्यमहिमातुझागुणहिफारवाहेविधी ॥
श्रुतिझहिम्हणेसदास्तविलआमुचीकेंविधी ॥
तरीजनयथामतिस्तवुनिजाहलेसन्मती ॥
स्तवार्ततुझियातुझ्यासमकवीकधींजन्मती २७
निजस्तुतितुम्हांरुचेस्तविततित्यांवरेंतर्पितां ॥
नमस्कृतिपरांवरेंस्वधनसर्वहीअर्पितां ॥
स्वभावतुमचाअसाविदितजाहलायाचकां ॥
करूंस्तवजसातसाफळनव्हेजनायाचकां २८

तुम्ही परम चांगले बहु समर्थ दाते असें ॥
सुदीन जन मी तुम्हां शरण आजि आलों असें ॥
पुन्हा हि म्हणतों बरें श्रवण हें करायास्तव ॥
समक्ष किति आपुला सकल लोक रायास्तव २९
किती श्रवण झां किती प्रभु हि काय ते पोळती ॥
पुसाल जरि कोण ते पदरजीं तुझ्या लोळती ॥
बरें तुजचि सोसवे स्तवन कृत्तिवासा गरा ॥
नपी तरि कसें घडे हितकरा दयासागरा ३०
गमो मधुर हें विष स्तवन सेवितां माजवी ॥
करी मलिन सद्यशो मुख वहल्या हल्या लाजवी ॥
हरापरिस तूं बरा प्रभुवरा सदां जोपिशी ॥
असा रस समर्पित्या अमृत आपुलें वोपिशी ३१
कवीश्वर मनः पयोनिधि सुता स्तुतीच्या पते ॥
भले न वरिती स्तुति प्रति न जोडिती पापते ॥
गळां पडति ज्यांचिया तव गुणैक देशभ्रमें ॥
तिहीं तुजचि दाविता भजति बा तुला संभ्रमें ३२

म्हणोनि कविता सुता तुज समर्पितों साजरी ॥
नसे बहुत शी गुणी कनक पीत वासा जरी ॥
तरी न इतरा वरी हरि करीं इला किंकरी ॥
मयूर हि निजात्मजा ग्रह विमुक्त जेसा करी ३३

स्मरोनि कुलमं तुला न कविता वधू स्वीकृती ॥
कराल तरि आयका प्रभुवरा च मी दुष्कृती ॥
नमस्कृति पुरःसर स्वकृति अर्पितों आजि ती ॥
दिल्ही रविसरवें तुम्हा जशि नमोनि सात्राजिती ३४

पिता रवळ परंतु ती गुणवती सती चांगली ॥
म्हणोनि मज आपुल्या भजनिं लावणें लागली ॥
म्हणाल तरि तस्करता कशि तुम्हासवें भांडगा ॥
अहर्निशिहि भांडला विनवरा न जो दांडगा ३५

तिलाहि वरवी म्हणा उचित होय तोषाकरें ॥
असेल सजलीं यथारुचि तयीं स्वयोषाकरें ॥
जशी पदरजें शिलापरि असे न हे शापिली ॥
धवें हरिमनोहरा कृति सती अघें व्यापिली ३६

भलेंस्मरण जाहलें समयिंकंसदासीकरें ॥
कशीउजरलीसमुज्वल दयासुधासीकरें ॥
तुह्मास्वरिपुचीतशी बटिकआवडेमत्कृती ॥
नकोनसजवेअसाबहुतकायमीदुष्कृती २७
जशीपृथुकतंदुलप्रसृति आप्तकामातशी ॥
रुचोकृतिसभाग्यतूं सुनय आप्त कामातशी ॥
कण्या विदुर मंदिरीं म्हणतिसाधु आस्वादिल्या।
खरेंजरिकशा तुजप्रभुसिं आपुल्यास्वादिल्या २८
जिणेंरस पहावया प्रशिथिलींरदींचाविलीं ॥
स्रुवासहिकळावया प्रथमनासिकींलाविलीं ॥
तुम्हासिशबरीतशीं बदरिकाफळें देजुनी ॥
कथा अशिअसोपहा स्वचरितें तुम्हीं मेजुनी २९
प्रभोशरण आलियावरिनद्धांकधींवांकडे ॥
म्हणोनि इतुकेंचहेंस्वहित कल्यजीवांकडे ॥
प्रसादकरितांनसेपळविलंबवापारवें ॥
घनांबुनपडे मुखीं उघडिल्याविनापारवें ४०

शिवेन तुझियापदा अदयतास्यदोषक्षण ॥
प्रभो चुकतसोंतरी करिसितूंचि संरक्षण ॥
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापिती ॥
रुचे विषय ज्यां मिळे अमृततें नमद्यापिती ४१
विपाक नगणोनि म्यां प्रकट आपुल्या घातकें ॥
कळोनि अमितें बळें विविधजोडिलीं पातकें ॥
क्षमस्व भगवन्न जामिळ सखोस्मि ऐसें तुला ॥
म्हणोन मुनियांसुदुस्तरविपन्नदीसे तुला ४२
नव्हे अनृत सत्य तें अचल ऊज्वलीलाकरें ॥
तुवां हरि मदापहें बृहदुदारलीलाकरें ॥
समुद्ररसि एकदा जरि जडासि या कर्दमीं ॥
म्हणोन भुवनत्रयीं तरितुला भला मर्दमी ४३
चिकित्सक भला भला म्हणुनि फार वाखाणिला ॥
जरी बहु जनामयद्रुमसमूकही खाणिला ॥
तथापि अति दुःसह स्वगदशत्रुच्या अत्यया ॥
विनान हृदयीं धरी सरुज पामरप्रत्यया ४४

म्हणा मज उताविळा गुणचि घेतला घावरें ।।
असो मन असेंचि वा भजक वर्हि मेघावरें ।।
दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें ।।
धरील मन आधि ने बहु परिभ्रमे चाकसें ४५
कृतांत कटकामल ध्वज जरा दिसों लागली ।।
पुरःसर गदा सवें झगडतां तनू भागली ।।
सहाय दुसरा नसे तुजविणे बळें आगळा ।।
न होजरि उताविळा स्वरिपु कापितो ह्मागळा ४६
अवश्य करणें खरें प्रणत रक्षण स्वोचित ।।
उशीर मग कां वसों कृपण मी हि कां शोचित ।।
नव्हे प्रभुवरा तुम्हां उचित एकटें धांवणें ।।
कृतांत शिवला नसे तव दिसे बरें पावणें ४७
करसें तरि करूं तुझें अवन पूरवूं आळजी ।।
असेल मनिं आमुची तुज कशासरे काळजी ।।
असें ह्मणि म्हणाल हो प्रियतमा जगज्जीवना ।।
तदाश्रित मृगासि ती सुखसमृद्धि वा जीवना ४८

सुखेंविसुख बाळका प्रकट होय मातेचिया ॥
तिला घडतिजे श्रम प्रियजनोत्तमा तेचिया ॥
म्हणोनिनशिवोपळ क्षणहि कष्ट जीवातुला ॥
विपज्जलधिसेतुला सकल लोक जीवा तुला ४९
असोत तुज आमुचीं सकळ भाविका युर्बळें ॥
जगोनि बहुकायम्यां सुकृत जोडिलें दुर्बळें ॥
असेंप्रिय तमा सुखी बहुनकाळ मायातमीं ॥
जनांसुपथ दाखवीं मुदित सत्तमा यातमीं ५०
भलेपरिशिले सुरासुर नरीं तसे लक्षमी ॥
म्हणोन म्हणणार वा तुज असा नसे लक्षमी ॥
उरीं भृगुपदाहती मिरवितोसि अद्यापिती ॥
कवीतव यशःकथा नवसुधा नवद्यापिती ५१
भवन्मातिस आवडे जरि धनादिकां लागिते ॥
मदीयगुणकीर्तनश्रवणकांतरीं त्यागिते ॥
असेंहि म्हणशीलवा जरितरी तुझीमावली ॥
तुजत्यजुनिपाजितां कशिदुधाकडे धांवली ५२

अनावरपिशाच्चिका विषयवासना सत्यजी ॥
असेंकरविकृत्यजी भुलवित्ये कधीं नत्यजी ॥
म्हणोनि तुज जाणत्या विनवितों इला कादगा ॥
करीन मग तूं जरी म्हणसि आपणा गादगा ५३
तुझ्या गुणकथामहा सुरभित्यांनही रासभी ॥
शिरेविषय वासना जशिशुका अही रासभी ॥
तशीन इतरांसभी इससदंडहीहाकिनी ॥
तथापि बहुलाथळी मग अदंड मी हाकिनी ॥ ५४
खरासुर जसा तशी विषय वासना हे खरी ॥
हिचा वध करावया तुजचि शक्ति आहे खरी ॥
बकीसुमतिता टका लघुनही भली लाजशी ॥
उगाचितशि एकही ब्रज वनांनली लाजशी ५५
कसेंतरि असो मग स्वपणरक्षणा कारणें ॥
अवश्य शरणागत व्यसन तोंस्वयें वारणें ॥
तुम्हांविहित मुख्य हें नपुसतां करा हो खरी ॥
निजोक्तिखर कायतो अधिक संहरा हो खरी ५६

खरीकरितसे कशी नवजनींहि सन्तापहा ॥
इच्छावधननिंद्यधा प्रबळमूर्त सन्तापहा ॥
कथासुरभिचारस स्वहित पुष्कळ स्वादुही ॥
म्हणेत्यजुनि कींमलानिज धना परस्वादुही ५७
कथा सुरभिया भल्यास्व जननीहुनी वाटती ॥
शिशूंस जरवंसही निरखितां रसें दाटती ॥
दुहा न भलते सदा तरिन लेशही आटती ॥
स्ववत्स मल भक्षिती परिन सर्वथा वाटती ५८
कथांसि उपमादिली सुरभिची दिसेनीटती ॥
परंतु बहुमंदमी म्हणुनि सच्छुती वीटती ॥
कथा निरुपमा तयांप्रति पशूपमा शब्दतें ॥
नव्हेचि न विचारिलें बुधजनासि म्या उद्दतें ५९
असेंहि उपदेशिती गुरु रहस्य मंदारुचे ॥
निजस्तव जसा तसा अगुणघेन वंदारुचे ॥
म्हणोनि निगम स्तुता भलतसें तुला वानितों ॥
परंतु हृदयीं महा जनभयासमीं मानितों ६०

म्हणेस्वकृतिच्याउणेकिमपिएकवर्णानहो ॥
असेंतुजकधींवरेंविगतशंकवर्णीनहो ॥
असेल अशिआवडी करिशिकांनअत्यादर ॥
स्वभक्तसुरपादपाहरिनसेचिसत्यादर ६१
ध्रुवस्तवनिंआवडीधरिम्हणोनिअत्यादरें ॥
तुम्हीकरुनिदाविलीशिवुनिगल्लसत्यादरें ॥
तसेंमजकराकरांवुजधराशिरींमावरा ॥
वराभयपरापराक्रमपटोमनाआवरा ६२
करांवुजअसोनसें उचितत्यासमीपामर ॥
प्रणामकरितीपदाप्रतिहिम्नन्मुनीसामर ॥
पदाब्जरजही जगत्त्रयनमस्क्रियाभाजन ॥
प्रसाद चतुराकसातरिंकरा वरा हाजन ६३
तुम्हींकरुनिदाविला ध्रुवकृतार्थजैसादरें ॥
तसेंचिजरियोजिलें तुमचियामनें सादरें ॥
असो विहिततें करापरिवरोवरी त्यासवें ॥
नसे उचिततो महाप्रबळ वंदिजे वासवें ६४

किनीवयकरसें तपप्रखर कायविश्वासतो ॥
ध्रुव ध्रुववरवरा स्तवा उचित होय विश्वासतो ॥
कशी तुळितसां तुम्ही प्रकटमेरुशीं मोहरी ॥
प्रसाद करितां उणें अधिक नाठवा हो हरी ६५
प्रभुत्व तरि हें बकीं करुनि दे कृपा दानतें ॥
स्वसाम्य यदुपार्जनें मिरविजे स्वपादानतें ॥
प्रसाद मग काय तो जरि निवारिना लाघवा ॥
कसें दशमुखानुजा विसरलां अहो राघवा ६६
असो हरि कसा तरीं विमल भावज्याचा करा ॥
तयावरि दयापचे वर असा चिद्याचाकरा ॥
वृथाचि गमतें दिलें बहु हि जें न दासा जिरे ॥
पुसोनि अधिकारप्या सुकरते सदा साजिरे ६७
प्रसन्न बहु होतसां परिकराल हो बावरें ॥
शिवा परिवरासवें हृदय हें न हो बावरें ॥
असा वरकृत भ्रमें न कळले कसें हो हरा ॥
भला जगविला तुम्हीं भव महाहिचा मोहरा ६८

भजे सुहृद निश्चयें द्विजकुमारकक्षीरधी ॥
न या करिं तुम्हींच ह्या मदनमारक क्षीरधी ॥
उदारपण तें वरें सुखविजें सुपात्रा सदा ॥
दिलें अमृत पन्नगा तशि खळीं कुपात्रा सदा ६९
अतिप्रिय सुखप्रद प्रथम तूं मुदं भो दया ॥
मधूर हृदया तुझी क्षणविटो न शं भो दया ॥
उदारपण वानिलें अजि गुरू पहा सावळें ॥
कसें करिल लेंकरूं निपट हें पहा सावळें ७०
तुम्हां हरिहरांत ज्या दिसत सेदि सो वास्तव ॥
प्रबुद्ध म्हणती नसे तिळहि भेद मी या स्तव ॥
म्हणें मनिं यथार्थ जें स्वमत वर्णिती शैव तें ॥
न वैष्णव दुराग्रही परम मुख्य हीं दैवतें ७१
म्हणो क्षण पुरांतक क्षण मुरांतक ब्राम्हणा ॥
मला जरि म्हणाल बा तरि विशंक लुब्राम्हणा ॥
तुम्हां शिव शिवा तुम्हीं भजत सां शुक व्यास हा
स्वदर्थ वदले पुरातन कथा न नव्या सहा ७२

तुझाचि अवतारतोसुतपराशराचाबळें ॥
तदुक्ति सजनप्रभो जरिनिजेमध्यें चावळे ॥
तरी त्रिभुवनेश्वरा तवविशुद्धनामावली ॥
मुखीं प्रकटहोयजी करिसुखीजना मावली ७३
तुझें कुशल नामजोनर हळू हळू आकळी ॥
दुरत्यय असामहा खळहि त्यासभीहाकळी ॥
हरींव्यसनपापहें बहुकशासकायाधवा ॥
परीत्वरितभेटवी तुजहियोग मायाधवा ७४
तुम्हासमचिहें गुणें अपुउणेंनसे नामहा ॥
दिसेअधिकहीनसा गुणतुलाअसे नामहा ॥
सदैव भलत्यासही सुलभ आणखी गायका ॥
छळीनन अधोगति क्षणहिदे जगन्नायका ७५
छळीनृपबळीबळी तरिंचतोनसेआटला ॥
गमे बहुभलामला नसकळांसही वाटला ॥
परीक्षक करीतसें जडहि सोशिने हेमही ॥
नकेवळविरोचनात्मजतरेपदें हेमही ७६

असानकरितांजरी छळतरींप्रभोतोभली ॥
सुकीर्तिकशिपावता कविसभाजिणेंशोभली ॥
पदींउपजतीनदीकशिकशीत्रिलोकींसती ॥
अशा अतुलमौक्तिकावलिविणें वरीदीसती ७७
नकोछळअधीरमींनशिनकीर्तिहोचामरें ॥
नृपासि उचितेंवृथामिरविलीं जरींपामरें ॥
अकीर्तिचअसोरुचे तुजकशीघजीकांवळी ॥
असेंनसमजाकसें वरिलहारिला कांबळी ७८
छळालकृपणासिकां अजिदयानिधे कापिती ॥
भटासिभटसंगरीं परिनकातरादापिती ॥
करालतितुकीकृपा बहुअहो शरण्यांतमीं ॥
बुडोनिशरणागतश्रमतसें अरण्यांतमीं ॥
मुखासिजंवपातलीश्रम अरण्यऐशीपदें ॥
निजस्मृतिसजाहलींविषयतींतवश्रीपदें ॥
गुरूक्तिसकरावयासफलजानकीजीवना ॥
धरासुरतपःफलेंत्वरितधांवलींजीवना ॥

नर्यांप्रभुवरातसे सदयकांअसे आजहो ॥
विचारुनिपहावरें निजमनींमहाराजहो ॥
वनोवनिं फिरापिशापरिम्हणां अहोरात्रहा ॥
नसेकुशल भाषणीं परिअसे कृपापात्रहा ८१
समागम तुझाघडो म्हणुनि जाहले लांकडें ॥
तपोनिधि तसे मुनित्य जुनिजोडिलीं माकडें ॥
जयुक्तबहुज्याजनास्तवघडे पडेसाकडें ॥
तदुक्तिहुनि आमुचें बहुतबोलणें वांकडें ८२
जगत्त्रयमनोहरा बलगुणैकरत्नाकरा ॥
म्हणे कनकरंकुच्यामजमहाप्रयत्नाकरा ॥
प्रियाहि अशिजाहली तुजकुकार्यआज्ञापिती॥
सुधात्यजुनिकामुक प्रकट अंगनाज्ञापिती ८३
स्वदाससमयींजपे तरिन देवराचाकरी ॥
चुकेनपरिसार्थक श्रमनदेवराचाकरी ॥
वदेहि भलतेंचितें तिसचि कोपटा कापुसा ॥
असें मृदुम्हणोनिवामजनधोपटाकापुसा ८४

नजेंप्रियसदोषतें प्रियसदोषही चांगलें ॥
स्वतोकपितरांरुचे जरिहि कर्दमीं रांगलें ॥
तुलाचिधरिपोटिशीं कशितदा यशोदा वरें ॥
जरीं मळविशीरजो मलिनकायतूं अंबरें ८५
तुझे कथिति गोपिका विविधतीस बोभाटते ॥
सुखप्रदगुणस्तवापरिसजाहले वाटतें ॥
क्षमानकरिएकदा तरिहि फारखोडीकरा ॥
नदेचि भय ताडनोद्यमसमेत सोडीकरा ८६
जरी ह्मणसि बांधिलें तरिनकष्टवीलें करा ॥
विचार जसि कष्टवा तसिनकष्टवीलें करा ॥
यथेष्ट पुरतेंजरी प्रथमदाम कां साधिती ॥
नतीप्रबळगोपिका नृजतुझीदयावांधिती ८७
तुम्हींहि बळि बांधिला म्हणुनि आमुचीमायजी ॥
मनांतसहजादया निपटराकिली कायजी ॥
सकोपदिसती गुरु क्षणभरीच जें तापलें ॥
जलज्वलनसंगमें त्यजिन शैत्य तें आपलें ८८

प्रसिद्ध तुमचे महा सदयपायजी वांकडे ॥
त्तुकीम्ह पुनि होतिलक्षणाहि कायजीवांकडे ॥
ननिष्ठुरपिताम्हणेमनिंनहोप्रजाटोणपी ॥
अपथ्यरुचिरुग्णतो कडुकओखदेंकोणपी ८९
असंख्यखळ संगरीं निजकरीं तुवांमारिले ॥
ननिष्ठुरपणें कृपा करुनितेभवीं तारिले ॥
जगज्जनकतूं मुलें सकळजीवयां भातुकें ॥
दटावुनिहिदेशिवा अमृतनेदिजे घातुकें ९०
वरि प्रकट शांतिला धरिपरंतु मीनावकी ॥
गिळीनशि तुलाटपे सुकृत बुद्धिही नावकी ॥
जिणें गरळ पाजिलें अमृतपाजिलेंतीसतें ॥
खळासिनदिसो भलेंपणखरें भल्यादीसतें ९१
सदाहिहितनायकों बहु अपायकेले करूं ॥
नरीसकृपवापतूंम्हणासिनायके लेकरूं ॥
कधींन करिसिप्रभो भजकबाळकोपेक्षण ॥
नतूंजवरि ज्यापरीपशुपपाळकोपेक्षण ९२

खरा जनक तूं जनां इतर कोण हो देववी ॥
समीहित फळें जगा तव पदाब्ज दे देववी ॥
अशी च करुणा असो हरि कधीं न भंगो पिता ॥
अशा मज असा धुला इतर कोण संगोपिता ९३
सुविद्य धन मेळवी वचन आइके आवरी ॥
प्रपंच भर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरी ॥
असा जरि न से रुचे तरि न तो अभद्रक्षण ॥
तसा तुज चि आवडे करिसि तूं चि तद्रक्षण ९४
पिता जरि विटे विटो न जननी कुपुत्रीं विटे ॥
दयामृत रसार्द्र धी न कुलकज्जलें त्या किटे ॥
प्रसाद पट झांकिती परि परा गुरूचे थिटे ॥
म्हणूनि म्हणती भले न ऋण जन्म देन्चें फिटे ९५
विटेल जननी हि कीं शतरची निमित्तें विधी ॥
मळे कलियुगीं श्रुती जा शिखळीं तिचीं ते विधी ॥
कदाचित विटेल वा तव दया न दीनावरी ॥
जशी जगद घक्षयीं करभ वन्न दीनावरी ९५

कृपाचि जननी तुझी सकल जीवदायादया ॥
तिणेचि उपदेशिल्या कारितिसर्व दायादया ॥
असेंउमजतां भले नगुरुभावतों याकिती ॥
मता तुजहि गोपिकामगजनासतो याकिती १७
भरोनिकुच कुंभजीविषरसें मुखीं देवकी ॥
प्रभोतिसहि देविशी जशिमहासुखीं देवकी ॥
नहोतिजननीकशापदकपदार गाईलया ॥
नपावतिल तत्सुखें कृतिनकोण गाईलया १८
अशीनरिकृतन्नना हरितुझ्याचठायीअगा ॥
सख्या अपुचिमानिशी करुनिसुमसादाअगा ॥
भुले सुकविवाग्वधूनवगुणाअनर्घ्यांनगा ॥
म्हणेल जन कोणकीं यश पुनः पुन्हां तेंनगा १९
तुम्हींबहु भले मला उमजहोय ऐसें कथा ॥
कसारसिक तोपुन्हा जरिम्हणेल आलीकथा ॥
प्रतिक्षणनवींचदे रुचिशुकाहि संन्यासिया ॥
नमोहिनिभवत्कथा अरसिका अधन्यासिया १००

कथाश्रवणचत्वरीं जरिपुनःपुन्हायेरते ॥
महारसिकतद्रसींविरतिऐकतांयेरते ॥
विलोकुनिविलासिनी जनपुनःपुन्हाकामुका ॥
करीवशनव्हेवुळाविवशघेइनाकामुका १०१
कथासुपुरुषातुझीवशनशीकरीराधिका ॥
जशीतुजजिलास्वयेंम्हणसितूंशरीराधिका ॥
तिचेंनघडतांरमाहृदयवल्लभासेवन ॥
प्रभोतुजजसेंतसेंमतिसगेहभासेवन १०२
कथाभुवनमोहिनीअशिनमोहिनीहोयती ॥
हरोअसुरधीहिणेंभुलविलेकितीहोयती ॥
नव्हेनम्हणवेअसोजरिधिमोहिलादक्षहा ॥
प्रियावसविलीगिरीं मुनिपथींकसादक्षहा १०३
सुरासुरनरोरगांभुलवुनीकथानत्यजी ॥
नभेदकरिपंक्तिचा अमृतपाजितीसत्यजी ॥
तिणेंजरिसुधारसस्वरतमानसापाजिला ॥
वर्षीअमृत चोरितां द्रवनयेचिवापाजिला ॥

अभिट चरितातजे तवकथे सविश्वासतां ॥
भली असुर वंचिनीं श्रुतअसेंविविश्वासतां ॥
कथाकशिसरवी तिचीठकवुनी हरी संचितें ॥
तरीं अमृतदे असें सदय दारववी वंचितें १०५
कराश्रवण येवदें अपट्ट लोक हांसो मला ॥
अहो जरिगिळावया प्रियकुमार घेसोमला ॥
तयासिंठकवूनिदे बहुतशर्करा मायजी ॥
तिला स्वशिशुवंचनें अदयता शिवे कायजी १०६
म्हणोनि बहु मोहिनी हुनि भलीकथा हे तुजी ॥
अभीष्ट फल द्यावया नतमनोरथा हे तुजी ॥
म्हणाल जरि मीं चत्या विषमकाय दोषींतरे ॥
जसा जनसिता ऽसिताभि धनदीसदोषींतरे १०७
अहा बहुविचित्र हें प्रभुतवस्वरूपाहुनी ॥
अभिन्न तनु त्या भले भजतिएकतापाहुनी ॥
परंतु वदतो जना नुभवनातळो पापगा ॥
तशीन यमुनागमे जशिगमेनिलिंपापगा १०८

जगद्गुरु महेश्वर प्रभु शिरीं जिचें नांदणें ॥
जिच्या जळमळें तुळे न शारदिंदुचें चांदणें ॥
प्रजा हरिहरा अशा यदुदरीं अनेका कवी ॥
भिऊन म्हणतील कां जशि सुधा न शी का कवी १०९
तुला स्वयमुने सवें कुवलयद्युति श्यामला ॥
म्हणाल जरि मोहिनी निज तनू अवश्या मला ॥
तुळीन अमृतोदधि प्रभव पुंडरीकामला ॥
कथा सुरधुनी सवें सुजन जींत विश्रामला ११०
शुकोदित पुराण ज्या श्रवणसन्मुखें साग्रही ॥
म्हणेल अतुला कथा झणि म्हणाल तो आग्रही ॥
न केवळ मलाचि हे निरुपमा यशोमंडिता ॥
गुरूसहि गमे पुसा स्ववरदा महापंडिता १११
प्रभो तुज न मोहिनी भुलवि मोहिला तो हि ती ॥
त्यजी जन नव्हे नशी तुज तुझी कथा मोहिनी ॥
निजानुभव तूं पहा जशि महौषधी पारदा ॥
तुला स्थिर बळें करी कळविलें तुवां नारदा ११२

सुरर्षि जवळीं स्वयें म्हणसि तत्र तिष्ठा मिषा ॥
तुझ्याचि वचनें म्हणें तु जकथा नशास्त्रा मिषा ॥
जसा स्थिर कथेंत नूं स्थिर करीं तसें या मना ॥
स्वभक्त सुरपादपा सफलहे असो कामना ॥३
सुरर्षि म्हणतो तुझें यशचि धन्य योगायना ॥
मला कवि म्हणोत ते सुखद अन्य योगायना ॥
विमुक्ति बहु साधनें तदितरें गणीं नाचतो ॥
सजूनि वरवल्लकी तव सभांगणीं नाचतो ॥४
तुझें चरित सन्मुखें श्रवण जाहलें या स्तव ॥
प्रजापतिसुतत्वयें करिति साधुज्याचा स्तव ॥
स्वनीच पण मागिलें बहुदया अशी नारदा ॥
स्मरे घडि घडि प्रभो भवपयोधिच्या पारदा ॥५
तुझें यशचि तारितें परिन केवळा तारवे ॥
सहाय अखिला असे तरिच शत्रुला मारवे ॥
न भागवत भेटतां न घडतांहि सत्संगती ॥
न अज्ञ हृदयें तरी तव यशोरसीं रंगती ॥६

बुडे बुडधि सागरीं तरि सुकर्ण धाराविना ॥
सहाय नसतां स्वयें परत यासि ती दाविना ॥
सहाय भगवज्जना तरि सुकीर्ति जेव्हां करी ॥
तईं च उतरी भवोदधितटीं जना लौकरी ११७
सत्संगति सदा घडो सुजन वाक्य कानीं पडो ॥
कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो ॥
सदंघ्रिकमळीं दडो मुरडितां हटानें अडो ।
वियोग घडतां रडो मन भवच्चरित्रीं जडो ११८
न निश्चय कधीं ढळो कुजन विघ्नबाधा टळो ॥
न चित्त भजनीं चळो मति सदुक्त मार्गी वळो ॥
स्वतत्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो ॥
पुन्हा न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ११९
मुखीं हरि वसो तुझी कुशल धाम नामावली ॥
क्षणांत पुरवील जी सकल कामना मावली ॥
कृपाकरि शितूं जगत्त्रय निवास दासांवरी ॥
नवी प्रकट हो निजाश्रित जनास दासांवरी १२०

दयामृतघना अहो हरिवका मयूराकडे ॥
रडे शिशु तयास घे कळवळोनि माता कडे ॥
असा अतिथि धार्मिकस्तुतपदा कदा सांपडे ॥
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां नदासां पडे १२१

## श्लोक

कारुण्यांभोद रामप्रियसख गुरुही जो मयूरा नदाचा
होतां तापत्रयार्त त्वरित भववनीं रक्षिता रानदाचा ॥
त्याचें साचें स्वभद्र स्मरण म गनतें त्याकसें येकवीस ·
केका एकासख्या तें स्मरुनि करि अशा एकशें एकवीस १

## पृथ्वी·

तनूभव वनिंत्रितापदवपाव केंकावली ॥ म्हणोनि करुणा
स्वरें करि मयूर केकावली ॥ दयाघन हरि त्वरें करुनि भा
वुकासारहा ॥ त्रिताप हरि त्यागमे स्वजन मीन कासारहा ॥ १

## आर्या

ऐकुनि विश्व सुखावे ज्या केकांचा अपूर्व तो दाहो ॥
त्यांला ईशकृपेनें आयुष्याचा कधीं न तो दाहो १

## कविता १ ली

### अन्वय

सदाश्रितपदा सदाशिवमनोविनोदास्पदा स्वदासव
श मानसा कलिमलांतका कामदा वदान्यजनसद्गुरो
प्रशमितासन्मदा गदारिदरनंदकांबुजधरा सदान-
मस्ते तेसदा नमः

### अर्थ

साधुजनांनीं आश्रय केलाआहे ज्याच्यापायांचा
अशा, शंकराच्या मनाला आनंद देणाऱ्या, आपले
सेवकांस अनुकूलआहे मानस ज्याचें अशा, पापा
चा नाशकरणाऱ्या, इच्छिलेलें देणाऱ्या, दातेजनां
चा स्वामी अशा, असंख्य दुष्टांचा गर्व हरणकेला-
ज्याणें अशा, गदा, चक्र, शंख आणि कमलधा
रणकरणाऱ्या त्यातुला सदोदित नमस्कारअसो.
(ह्याकेकेंत कवीनें ईश्वराची स्तुति केली.)

## कविता २ री

ह्या पुढील दोन कवितेंत कवीनें भगवंताच्या पदक-
मलाचें महात्म्य वर्णन केलें आहे.

### अन्वय

तुझें जें पदाब्जरज तें सकलपावनाधार राधारतें
तुवांचि बहु अघाचकहि तारिले अजामिळ अघा-
सुर व्रजवधू बकी पिंगळा अशां गतिदिली
विंगळा तृणभेदतां नडरे.

### अर्थ

तुझ्या पदकमळांच्या धुळीचे रजःकण सकल जनास पवित्र करणारे आहेत. राधेच्या ठायीं रममाण होणारा असा जो तू. त्या तू मोठमोठ्या पाप्यांससुद्धां पवित्र केलें, (अजामिळ. अघासुर, गोकुळांतील स्त्रिया, पूतना आणि पिंगळा अशीं महा पातकी.) अग्नीस तृणाचा स्पर्श झाला असतां तें जसें जळून जातें त्याप्रमाणें तूं मुक्त केलींस.

## कविता ३री

### अन्वय

तुझ्या पदाच्या रजें बहुत अघनिधी शोधिले बुधजनीं सदा चारजें वर्णिती तें अनृतन असें सतत ऐकते सतत बोलते मीच जरी तें प्रमाण न म्हणों माझिया नीचतें उचित.

### अर्थ

तुझ्या पदाच्या रजानें असंख्य पातकांचे समुद्रच असे मोठमोठे पातकी पावन केले. ज्ञानीलोकांमध्यें जे संपन्न ते जें वर्णितात. तें कांहीं खोटें नाहीं. असें सतत ऐकणारे आणि बोलणारे सांगतात तें मीच जर खरें नाहीं असें म्हणेन, तर तें माझ्या लघुत्वास योग्य आहे (मला हलकेपणा आणणारें आहे.)

## कविता ४थी

मागील कवितेंत सांगितलेल्या महान महान पातक्यांचें उद्धरण झालें आणि आपणच कसे राहिलों

असा संशय घेऊन कवी म्हणतो.

## अन्वय

तसाचि कसा उरलों कायमी पतित नरसें कीं जगन्नायकीं कृपाचि सरली. असेंहि नघडे कसा दिसलों नसेन नयन सर्वसाक्षी रवी विषाद धरिला म्हणो सुरभी विषन. क्षीरवी.

## अर्थ

मोठमोठ्या पातक्यांचा उद्धार केला आणि मीच कसा राहिलों, मी पातकी नाहीं काय? किंवा जगा-चा स्वामी जो त्याचे कृपेचें भांडवलच संपून गेलें, असेंही होणार नाहीं. कदाचित मी दिसलों नसेन असें जर म्हणावें तर सर्व जगातें पाहणारा जो सूर्य तो त्याचा नेत्र आहे मग मीच कसा दिसलों नाहीं; त्याला मी दिसलों हेंच खरें. जशी गाय आपल्या मनांत कितीजरी रागे भरली तरी ती दूधच देईल विष कधींही देणार नाहीं तसा माझ्याविषयीं तो आहे.

## कविता ५ वी

या केकेंत कवि ईश्वराच्या दयाळुपणाचें वर्णन करितो.

## अन्वय

यजाचन करावया नरवाग्रीं धरा वसविलें मंदरारव्य नग ही तें सलील स्वपृष्टीं धरा. वराह तनु घेउनी रदाग्रें धरा उचलिली. हा पतित तुम्हां खुदु-

र्भर कसा कां न उद्धरा.

अर्थ

गो*कुळाचें रक्षण करण्याकरितां नखाच्या अग्रभागावर पर्वत ( गोवर्धन ) धरिला. पृथ्वी बुडत होती तेव्हां सहज लीलेनें मंदराचल नांवाचा पर्वत आपल्या पाठीवर धरिला. डुकर होऊन वराह अवतारीं दांताचे अग्रावर पृथ्वी उचलली. मग मीच तुम्हाला उचलण्याला कठीण कां (माझा अंगिकार करण्यास अयोग्य कसा ) मला कां उद्धरीत नाहीं. अर्थात उद्धरा.

कविता ८ वी

याहीकेकेंत कवी भगवंताचे दयाळुपणाचें वर्णन करितात.

अन्वय

बाधावनीं नतावन धृतव्रत ज्वलन तूंचि वा पदमणत संकटीं धावनीं भजब तूंचि त्या वारणीं सतिव्यसन वारणी वा त्या रणीं जयजयार्थ दया प्रकट कवण दाखवी सांग.

अर्थ

तुला जे शरण येतात त्यांचें रक्षण करण्याचें व्रतच घेतलें आहेस आणि त्यांचें संकटरूपी वन ( अरण्य )जाळण्यास तूंच अग्नि आहेस म्हणजे तूंच त्यांचें रक्षण करून सर्व संकटांतून मुक्त करितोस.

---

* गोकुळांतील लोक

शरणागत भक्तांचें संकटांत रक्षणकरण्यास मोठा वेगवान तूंचआहेस म्हणजे तूंच लौकर धांवत जाऊन त्यांस संकटांतून सोडवितोस. त्या वारणी म्हणजे त्याहत्तीला आपण नक्राच्या मिठींतून सोडविलें त्यावर आणखीं सती ( द्रौपदी ) हिचें संकटनिवारण करण्यांत किंवा त्या भारतीयुद्धांत धर्मास जयप्राप्ति व्हावी म्हणून उघड दया कोणी केली, तूंच केलीस.

## कविता ७ वी

यां केकेंत कवीनें भगवंताच्या,भक्तकार्याविषयीं औत्सुक्यतेचें वर्णन केलें आहे.

## अन्वय

यद्रतिसुखास रमाहि दारापरी सुपात्र न असा प्रभुहि सेवकां खास दारापरी भजसी जिहीं पियाकुचतटीं बहुवार पत्रावळी न काढिल्या तिहीं नृपमखांत पत्रावळी काढिल्या.

## अर्थ

ज्याच्या रतिसुखाला लक्ष्मीदेखील योग्य नाहीं म्हणजे प्रत्यक्ष रूपवती लक्ष्मी सारखी स्त्री असतांतीही ज्याचे प्रेमाला योग्य नाहीं असा तूं देवा आपल्या दासांची घोडक्याप्रमाणे सेवा करितोस. देवा ज्या तुमच्या हातांनीं ( तुम्हीं ) पुष्कळवेळां आपल्या स्त्रीच्या कुचप्रांतीं रंगाच्या

वेलबुट्याही काढिल्या नाहींत्यातुह्मींधर्मराजाच्या यज्ञ समारंभांत अगणित पत्रावळी काढिल्या.

## कविता ८ वी

या केकेंत कवी आपल्याविषयीं ईश्वराच्या औदासिन्य तेचें वर्णन करितात व त्याचें निरसन करितात.

## अन्वय

नपावसि म्हणोनिमीं तुला आळसी म्हणतसें हे असदुक्ति बरीन रविसरवोत्थिता आळशी जे मनीं असंख्यजन तर्पिले क्षुधित एकला चुकेल तरि वदान्य त्यासदे परिमनीं लाजे.

## अर्थ

मला तूं पावत नाहींस म्हणून मी तुला आळशी म्हणतों हें माझें खोटें भाषण चांगलें नाहीं. सत्राजितानें तुजवर चोरीची आळ घेतली होती त्यापेक्षां मीतुला आळशीम्हणून जो दोष दिला तो जरी चांगला नाहीं तरी सत्राजिताच्या आळीपेक्षां कमी आहे. आणि तोतरी देण्याला, तूं मला पावत नाहींस. हेंच कारण आहे. दात्यानें भोजन समारंभांत असंख्य लोकांस तृप्त केलें त्यांत एखादा जरी चुकलेला असेल, तरीं त्यासही जेवूं घालितो परंतु दाता आपल्यामनामध्यें लाजतो.

## कविता ९ वी

## अन्वय

अगाप्रणतवत्सला म्हणतित्या जनां पावला म्हणोनिमी

तुमच्याचपावलां सदास्मरतसें वरीकृपाकरूं व्यस-नहरूं हा दीन तापला असें मनिंधरा मला आपलाख रा भरंवसा आहे·

## अर्थ

अहो शरणागतांवर दयाकरणारे असे जे तुम्हांला म्ह-णतात; म्हणजे हे भक्तवत्सल अशाजे तुम्हाला हांका मारितात; त्यांवर तुम्हीं कृपाकरितां· ह्या कारणास्तव मी तुमच्याच पायाचें सदोदित स्मरण करितों·अशी माझी भक्तीपाहून याच्यावर दयाकरूं याचें सर्व संक ट निरसून टाकूं हा दीन ( मोरोपंत ) फार त्रासला असें आपले मनांत आणा मला खरोखर आपलाच भ रंवसा आहे·

## कविता १०वी

भवत्नरण कन्यका आपगा मलानिरखितां अगइ-असें पाप कधींहि न ऐकिलें गा म्हणे- ती श्रवणीं कर ठेवी नेत्र नुघडी भीतिला घे जरीहिमी कार्यलो भीतिला भिडेस न घालीन·

## अर्थ

मला गंगानदीनें पाहून अगई ( अययी ) असें म्ह णून एवढें मोठें पाप कधींहि ऐकिलें नाहीं· ( तुझ्या सारखा पातकी कधींहि पाहिलानाहीं ) असें ती बो-लली· तिनें कानावर हात ठेविले, डोळे मिटले आ णि भिऊनगेली· म्हणून जरीही मला आपलें कार्य क

र्तव्य आहे तरी अशाभिन्नीला मी कधींहीभीड घालणार नाहीं.

## कविता ११ वी

### अन्वय

जरी सदैव नमितां किणे पद ललाट केलें तरी भवत्प-दाज्ञाविणें मज इतर तारिता नसे ततां मुक्त करू-निही मी रिणें बुडालोंम्हणसी अशा तुज जो मनुज न भजे तयाचें जिणें धिक्

### अर्थ

-जरी* सदोदित त्याच्या पायांवर साष्टांग नमस्कार घालून घट्टे आले तरी आपल्या चरण कमलावांचून दुसरा कोणीही माझें रक्षण करण्यास समर्थ नाहीं. तुझ्या चरण कमलाच्या ठायीं जे कोणी नम्र होतात त्यांस तूं मुक्तीला नेऊन आणरवी उलटें मीं तुमच्या ऋणांत बुडालों असें म्हणतोस असा तूं जो दयालु त्या तुला जो कोणी भजत नाहीं त्याच्या जीविलास धिक्कार असो.

## कविता १२ वी

### अन्वय

सकलेंद्रियीं पटुत्व मनुजता सुवंशीं जनीं. जे मनीं बहु अलभ्य कीं तें भलें द्विजत्वही दिलें यशः श्रवण कीर्तनीं रुचि दिली तरी हा अखिल याचकीं हां-वरा अधिक वरा याचकीं म्हणे.

---

* जरी सदोदित त्यास नमस्कार घालून माझें कपाळास व पायांस घट्टे आले असाही कोणी अर्थ करितात.

पांच कर्मेंद्रियें आणि पांच ज्ञानेंद्रियें या दहाही इं द्रियांस आपआपलीं कामें करण्यामध्यें दक्षता, मानव जन्म, श्रेष्ठ कुलांत जन्म आणि जें लोकांस मिळण्यास कठीण तें चांगलें ब्राम्हणत्वही दिलें. तुझे गुणानुवाद श्रवण करण्यास आणि ते कथन करण्यास अभिरुची दिलीस तथापि सगळया याचकांमध्यें अधिक हावरा (आसतुष्ट) मला अधिक वर द्या असें म्हणतो.

## कविता १३वी

### अन्वय

वरदवत्सला श्रीकरा तूं असें न म्हणशील परंतु मज भासलें म्हणोनि मी करा जोडितों बहु वरें दिलें खरें परी ती कृपा व्यंग गमे जों संगती न तों अलंकृतमती मनीं मनीं झुरे.

### अर्थ

हे इच्छिलेलें देणाऱ्या दयानिधे देवा तूं असें म्हणणार नाहींस. परंतु मला उगीच वाटलें म्हणून मी तुला हात जोडितों. इंद्रियांमध्यें दक्षता वगैरे जें पूर्वी सांगितलें तें तूं मला चांगलें दिलेंस खरें. तथापि तुझी कृपा थोडी न्यून आहे. कशी म्हणशील तर, जावत्कालपर्यंत पतीचा आणि आपला समागम नाहीं, तोंपर्यंत वस्त्रालंकारांनीं युक्त अशी स्त्री आपल्या पतीची मार्गप्रतिक्षा करीत आ-

पले मनांत स्फुरत असतें त्याप्रमाणें.

## कविता १४ वी

पुढील दोन कवितांत कवि दयेकरितां ईश्वराची प्रार्थना करितात.

## अन्वय

पुरती दया कराल तरि दिलें पावलें असो परंतु हरी एकदां त्वरित पावलें दाखवा जरि प्रसाद करणें मनीं नसेल हें आवरा जया बहु नयास द्या मज कशास मी हांवरा.

## अर्थ

मजवर जर आपण पूर्णपणें दयाकराल तर पूर्वी सांगितलेलें जें कांहीं तुम्हीं दिलें आहे तें मला पोहोंचलें परंतु हरि एकवार आपल्या पदकमलांचें मला लौकर दर्शन द्या तुमचे मनांतून जर मजवर, अनुग्रह करणें नसेल, तर तुम्हीं जें मला दिलें आहे तें सारें आटोपून ठेवा. ज्याला तें पुष्कळ वाटेल त्यास द्या. मला कशाला मी हांवरा आहें.

## कविता १५ वी

## अन्वय

दिलें फिरुनि घेतलें अशि अकीर्त्ति लोकीं नहो तुझीं सुनिर्मल पदें कधिंतरीं विलोकीन हो. निजप्रियजनाकडे नरिहि हवाला दे जसी समजविसी पडेल नसिकरोत कां लाजसी?

## अर्थ

देवा मला जेंकांहीं दिलें तें तुम्हीं परत घेतलें अशी आपली अपकीर्ति लोकांत न हो. तुझे पवित्र पाय मीं कधींतरी विलोकीन असें होऊंदे किंवा अहो मी तुमचीं पदकमलें कधींतरी पाहीन आपल्याप्रिय भक्तांकडे माझा हवाला दे त्यांजकडून माझी जशी समजूत पडेल तशी ते करोत, तूं कांलाजतोस ?

## कविता १६ वी

कवीनें मागल्या केकेंत ईश्वरास 'कांलाजसी, असेंम्हटलें हा आपल्याकडून मोठा अपराधच झाला असें समजून पुढील सहा कवितेंत त्याचें शांतवन करितो.

## अन्वय

अहा मी निपट धृष्ट प्रभुवरासिं कांलाजसी म्हणे भाविकां लाजसी नसी तुजविकृतिनसो परंतु हा अपराध गुरु म्हणोनि शिक्षाकरी नयच्युतदमार्थ करीं दीक्षाकरीन्ही असेंचि.

## अर्थ

अरेमीकेवळ दांडगामनुष्यआहें कारण ईश्वराला सुद्धां मी कांलाजतोस असें म्हणतों. संसारी लोकांना ज्याप्रमाणें या माझ्या 'कांलाजसी, शब्दापासून वाईट वाटलें तसें तुला वाटूं देऊंनको परंतु हामाझा अपराध मोठा आहे म्हणून तूं मलाशिक्षाकर .

कारणनीतीपासून जेकोणी भ्रष्टझाले त्याना दंडक रणे हें तूं व्रत धारण केलेंआहेस.

## कविता १७ वी

### अन्वय

गा असेहे अपराध. कोटि सदैवरचितसें स्वयेंहि कथितों तिळहि लाजनसे मी कोटिगा जाउदरीं सर्वदा अजांड शतकोटि नांदवा त्यांत यां अवका शन तदांदवा स्थल कां दिलें.

### अर्थ

असें अपराध मी सदोदित कोट्यावधि करितों स्व- तां ते मी आपल्या तोंडाने सांगतों मला लाज ना- हीं मी कोडगा आहें तुम्हीं ज्या आपल्या उदराम- ध्यें शतकोटि ब्रम्हांडें बाळगितां त्यांत या माझ्या अ पराधांनाच जागानाहीं मग तुम्हीं त्याकाळीं वणव्या ला जागा कशीदिली.

## कविता १८ वी

### अन्वय

तुझ्यापोटें बहुत भणतमंतु जिरविले पण मजपरा- ध त्यजी हें खोटेपण मजकडेचि जठरीं अतिक्षुधि त दवाग्नि त्यास हें अन्नद्या तुमचियादयासन्नद्या श्रृतां वितृष्ण करिती.

---

बाळपणीं गोकुळांत असतां कृष्णाने १० कोश वणवा गिळिला अ शीकथा हरिविजयांत आहे.

## अर्थ

तुझ्या पोटानें शरण आलेल्या लोकांचे पुष्कळ अप राध जिरविले ( तूं त्यांना क्षमा केलीस ) परंतु माझेच अपराध टाकून देतें हा माझाच खोडुसाळूपणा आहे. तुमच्या पोटामध्यें त्या मागें सांगितलेल्या दावाग्निला अतिशय क्षुधा लागली आहे त्यास माझे अपराध हें अन्नद्या ( माझे अपराध जाळून टाका. ) तुमच्या दयारूपी शुद्ध नद्या तुमच्या आश्रय करणाऱ्यांना शांत ( संतुष्ट ) करतात.

## कविता १९ वी

## अन्वय

कवणाहि न होयतें चरित तुमचि याचि लीलालसें पदें त्रिजगदब्ज कीलालसें दाविजे मदुद्धरण मात्र तुम्हां कां जडदिसे मर्त्यही स्वकव्यसन वारिती से वारिती न करितीच.

## अर्थ

कोणालाही जें होतनाहीं तो चमत्कार आपल्या लीलेनें आळसपणानें ( सहज ) दाखविला. ज्याप्रमाणे उदक कमलासभोंवती व्यापून टाकतें त्याप्रमाणें त्रिभुवन रूप कमलाला तुझ्या पायानें व्यापून टाकिलें. अशीं तूं नानातऱ्हेचीं चरित्रें दाखिव

---

* वामन अवतारीं देवानें आपल्या तीन पावलांनीं त्रिभुवन व्यापिलें होतें अशी कथा पुराणांत आहे.

तोस मग माझेंच उद्धरण करण्यास तुम्हांला इतकें अवघड कां दिसतें आपले आश्रितजन सुद्धां त्यांचें संकट दूर करितात परंतु रिकामी सेवा कोणाचीच करीत नाहीं ( त्यांची सेवा निष्फळ होऊं देत नाहींत. )

## कविता २० वी

### अन्वय

तूं दयाब्द वळशील तरि चातकां सेवकां किमपि उणें न तूं देव भाविकां उबगशील कां अनन्यगतिकां जना सोपद्रवा निरखितां चि करुणार्णवा तुझें चि मन उमोपद्रवा धरी.

### अर्थ.

तूं दयारूप मेघ जर फिरशील, तर आम्ही जे चातक रूपी तुझे भक्त त्या आम्हांला कांहींएक उणें नाहीं. तूं देव आम्ही जे भोळे भाविक जन त्यांस कंटाळशील काय? तूं आमची उपेक्षा करणार नाहींस ) अनन्य भावें करून तुला जे कोणी शरण येतात त्यांस तूं पीडिलेले असे पाहतांच हे दयासागरा तुझ्याच मनाला दयेचा अतिशय ओलावा येतो ( तुलाच दया येते. )

## कविता २१ वी

### अन्वय

कळी सुनिर्मळी नळीपरम उग्र दावानळीं तयांत मी अविशुद्ध जेवि दावानळीं शलभ मन्मनींस्म

रादिरिपु वनीं पशुच्याशिरावरि व्रणार्थ काक से उभे अहिभे काळ करेन.

## अर्थ

*कलीने पवित्र अशा नलराजाचा अतिशय छल केला. तशांत मी अपवित्र, वणव्यांत टोळ सांपडला असतां जशी त्याची दशा होते त्याप्रमाणें मी कलिरूप वणव्यांत सांपडलों त्यांत पापी मग माझे सहज हाल होतील. वनांत पशूच्याशिरावर व्रण करण्याकरितां कावळे जसे टपले असतात त्याप्रमाणें माझ्या मनांत कामक्रोध आदीकरून रिपु माझा नाश करण्याकरितां उद्युक्त आहेत. सर्प बेडकाचे काळ कसे नसतील? असतीलच त्याप्रमाणे षड्रिपु हे माझे नाशक आहेत.

## कविता २२ वी

कवी आपल्या तारणोपायाकरितां ईश्वराची प्रार्थना करितात.

## अन्वय

नाविका तुमच्याबळें भवमहानदी तरेन मग आतरास्तव मला तुम्हींच रुदीनाविका मज सदाश्रमीचा वासही विदित असे स्वयें गुण प. हा मज सदाश्रमीचा करा दया करा.

---

* कलियुग

### अर्थ

हे नौकेंतून तारणाऱ्या ईश्वरा तुझ्याच बळानें मी संसाररूपी मोठीनदी तरून जाईन मग तुम्हींचे अतिशय दरिद्री जो मी त्यामला उताराकरितां वि कूनटाका. मला साधुजनाच्या आश्रमांतीलवास (राहणें) ठाऊक आहे तुम्हीं स्वतां माझे गुण प- हा आणि सदोदित कष्ट करणारा जो मी तुमचाचा कर त्या मजवर दया करा. ( तुम्हीं मला भक्तांचे स्वाधीन करा. )

### कविता २३वी

माझे भक्त द्रव्यहीन आणि तूंही द्रव्यहीन तेव्हां तुझा काय उपयोग असें ईश्वर कदाचित म्हणेल अशी शंका धरून कवि म्हणतात.

### अन्वय

तुमचियापरि जना घरी धना कायसें उणें मणि हे मभूपतिस आयसें जोडिल्या लाभ न, परि प्रभु हि सकलवस्तूंला संग्रहीं ठेविती गुणा उणा न म्हण तां अधिक आदरें सेविती.

### अर्थ

तुमच्या सेवक जनाच्या घरीं द्रव्याला काय तोटा आहे? कांहीं तोटानाहीं ज्याराज्याजवळ रत्नें, सोने आणि भूमी हीं आहेत त्याला लोखंड मि ळालें असतां कांहीं लाभ नाहीं हे खरें आहे. त-

थापि श्रीमंत लोक अत्यंत हलक्या वस्तूस सुद्धां आपल्या संग्रहास ठेवितात आणि त्याचे गुण कमि जास्त वगैरे न पहातां ( त्या गुणाला उण्या आहे त असें न म्हणतां मोठ्या आवडीनें त्यांचें सेवन करितात

## कविता २४ वी

### अन्वय

प्रभो मी शाश्वत प्रकृतिरंक दिसें म्हणुनी काय हो खरें तुमचे पाय मजवरी प्रसन्न होवोत इंदिरा कुहदुरोज संगा क्षण त्यजुनी शिरीं पद धरा सुशील गंगाधरा सम सखा मिळे·

### अर्थ

हे देवा मी भिकारी दिसतों म्हणून मी जन्मदरिद्रीच आहें काय ? तुमचे पाय मला प्रसन्न होऊं द्या· लक्ष्मीच्या मोठ्या स्तनांपासून तुम्हीं आपले पाय काढून माझे मस्तकावर ठेवा मग मी तुमचा शंकराप्रमाणें सखा होईन·

## कविता २५ वी

याकवितेंत कवि आपल्या स्वताला स्तुति करतां येत नाहीं असें दर्शवितात·

### अन्वय

प्रभुस्तुतिन ठाउकी न परि तिच्या महा कामुकामला कृपण मुका बहु सकाम हाका मारितां असे म

म्हणा लेंकरा प्रथम नीट कसें ये हळु हळु पदुस्व-
येंं सुपथिं लाविये लेंकरा ( किंवा हळुहळुपदु कसें
स्वयें लेंकरा सुपथीं लाविजे.

## अर्थ

ईश्वराची स्तुति कशी करावी हें मुळींच ठाऊक नस-
तां, मी जो स्तुतिप्रिय ईश्वर त्या मला कृपण ( स्तु-
तिकरण्यास अशक्य ) आणि मुका माझी स्तुति कर
ण्यास मनांत मोठी उत्सुकता धरून माझे नांवानें
उगाच किंकाळ्या फोडितो. लेंकराला शिकवल्याशि
वाय कोणतेंही काम बरोबर कसें करितां येईल .
अर्थात येणार नाही. हळुहळु तुम्हीं स्वतः त्याला शा
हाणें करून चांगल्या मार्गाला लावा. ( मला उघड
पणाने तुमची चांगल्या प्रकारें स्तुति करितां येईल. )

## कविता २८ वी

या कवितेंत कवि लोकरीति दाखवितात.

## अन्वय

जनीं तरी असें असे, शिशु ही जे मुखें वर्णवि पि-
ता ते पिऊनी भुले मधुरता सुखें वर्णवि जगीं मना
नये प्रायशः कटु गुरुक्त हि म्हणे दयानिधि अशा
जनकथा तुम्हांपुढें कायशा.

## अर्थ

लोकांमध्ये तरी असेंच आहे, लहान बालक आप-
ल्या तोंडाने जीं अक्षरें ( शब्द ) बोलतो तीं ऐकून पि

त्याला मोठा संतोष होतो. आणि तेच तेच त्याचे मधुर शब्द, त्याजकडून पुन्हापुन्हा बोलवितो (पिता त्या शब्दांचें स्वतः वर्णन करितो जरी त्या लहान मुलाचे शब्द बापास आवडत नाहींत, तरी कडु असे जे त्या बालकाचे शब्द, हे चांगले आहेत असें तो म्हणतो. हे कृपासागरा, अशाह्या लोकांच्या गोष्टी तुम्हांपुढें सांगून काय उपयोग? तुम्ही दयासागर आहां, माझ्यावर सहजच दया कराल.

## कविता २७ वी

मनुष्य ईश्वर स्तुति करण्यास अशक्य आहे असें कवि या केकेंत दर्शवितात.

## अन्वय

तुझा महिमा अतर्क्य, गुणहि फार, विधि बाहे; श्रुतिज्ञाही सदा म्हणे आमुची धी केवी स्तविल तरी यथामति स्तवुनि जन सन्मति जाहले; तुझिया स्तवार्थ तुझासम कवि कधीं जन्मति.

## अर्थ

तुझा महिमा इतका मोठा आहे कीं, त्याचा विचार सुद्धा करितां येत नाहीं; आणि तुझे गुणही असंख्य आहेत, असें ब्रम्हदेव सांगतो. वेद जाणणाराही सदोदीत असेंच म्हणतो. मग आमची बुद्धि तुझें स्तवन कसें करील. जरी स्तवन करण्यास शक्य नाहीं तरी आपल्या शक्तिप्रमाणें स्तवन करून कांहीं लो

क सुमती झाले. ( तुझी स्तुति करण्याकरितां तु झ्यासारखेच कवि जन्मले पाहिजेत. )

## कविता २८ वी

### अन्वय

तुम्हां निजस्तुति रुचे स्तविति त्या बरें तर्पितां न मस्कृति परांबरें स्वधन सर्वही अर्पितां असा तुम चा स्वभाव याचकां विदित जाहला जसा तसा स्त व करूं याच जनां कां फळ नव्हे.

### अर्थ

तुम्हाला तुमची स्तुति आवडते, आणि जेकोणी तु मची स्तुति करितात, त्यांना तुम्ही संतुष्ट करितां; इतकेंच नव्हे, तुम्हाला जेकोणी सप्रेम अंतःकरणा- नें नमस्कार करितात, त्यांना तुम्ही आपलें धन (त्या रही मुक्ति देतां ) असा तुमचा स्वभाव याचक जनां ला ठाऊक जाहला, आम्हांला जशी तुमची स्तुति क रितां येईल, तशी करूं, मग आम्हाला (मोरोपंता- स ) याचें फल देत नाहींस.

## कविता २९ वी

### अन्वय

तुम्हीं बहुत चांगले बहु समर्थ दाते मीजन सुदी न असें आजि तुम्हांस शरण आलों असें हें बरें भ वण करा यास्तव पुन्हांही म्हणतों सकल लोकराया समक्ष आपुला स्तव किती.

## अर्थ

तुम्हीं फारचांगले, शक्तिमान, आणि दाते आहां, आणि मी अगदीं भिकारी आहें, मीं आज तुम्हांला शरणआलों असेंहें माझें स्तवन तुम्हीं ऐकावें म्हणून मी पुन्हापुन्हां म्हणतों. हे सकल लोकराया तुमची स्तुति मी किती करणार आहें (तुमच्यापुढें मी स्तवतो काय करणार.)

## कविता ३०वी

### अन्वय

प्रभु किति श्रवण झांकिती कायतें पोळती. ते कोण जरी पुसाल तुझ्यापदरजीं लोळती तुजचि स्तवनवरेंसोसवे, कृतिचासागरानपीतरी कसें घडे

### अर्थ

हे प्रभु कितीक दुसऱ्यानें केलेली स्तुति श्रवण करूंनये म्हणून आपले कान झांकितात. जसेकाय ते स्तुतिच्या योगानें भाजूनच जातात. असे कोण म्हणून जर विचाराल, तर तुझ्यापायांच्या धुळींत, लोळणारे जे साधुजन, तेच होत. तुला तुझी स्तुति सोसते, इतरांसतर मुळींच सोसणार नाहीं. शंकर जर विष* प्याला नसता तरमग कसें झालें अ

* समुद्र मथनाचेवेळीं वासुकीच्यामुखांतून विष निघून तें सर्व जगास जाळूंलागलें तेव्हां जगाचें रक्षण होण्याकरितां शंकरानेंविष प्याला अशीकथा पुराणप्रसिद्ध आहे.

सतें. हे कृपासागरा तुम्ही शंकराप्रमाणेंच आम-
चें कल्याण करा.

## कविता ३१ वी

### अन्वय

हें विषस्तवन मधुरगमा, सेवितों मानवी, त्यय
शोसुख मलिन करी, हलाहला लाजवी, प्रभुव-
रा तूं हरापरिस बरा, जो सदा पिसी असा, त्स स
मर्पि त्या आपुलें अमृत ओपिसी.

### अर्थ

हें विषासारखें स्तवन आपण गोड मानितां
जो कोणी त्याचें सेवन करितो, त्याला तें उन्म-
त्त करितें आणि त्याच्या सत्कीर्तिरूप सुखा-
ला कालिमा आणितें एवढेंच नव्हे तें वासुकी
च्या विषालाही लाजवितें. हे नारायणा, तूं शं
करापेक्षांही फार चांगला आहेस. कारण शंकर
विष एकवारच प्याला परंतु तूं स्तुतिरूप ह-
लाहल नित्यशः पितोस. दुसरें कारण जो को
णी तुझी स्तुति करितो, त्याला तूं आपलें अमृत
यथेच्छ देतोस.

## कविता ३२ वी

या कवितेंत कवि स्तुतीला कन्येचीउपमा देतात.

### अन्वय

कवीश्वर मनः पयोनिधिसुता स्तुतीच्या पते.

मलेस्तुतिप्रति नवरिती, पापतें न जोडिती, तव गुणे
क देश भ्रमें ज्यांचियां गळां पडती, तींही तुजची दा
विता यातुला संभ्रमे भजती.

## अर्थ

हे कवीच्या मनरूपी समुद्राच्या स्तुतीरूप कन्येच्या
स्वामी भले लोकांनां स्तुति आवडत नाही, आ
णि स्तुतिरूप पाप आपणास लावून घेत नाहीं.
त तुझ्या गुणाचा अंश ज्या मनुष्यांच्या आंगी
आहे, त्यांनां मोहित होऊन ती स्तुतिरूपकन्या
त्यांच्या गळां पडते. त्यांनींही देवा तुलाच दाखवि
लें असतां ती स्तुति मोठ्या प्रेमानें तुला भजते.

## कविता ३३वी

## अन्वय

म्हणोनि कविता सुता तुज साजरी समर्पितों ज
री तरी बहुगुणी कनकपीतवासा नये तरी इ
तरां नवरी हरी इला किंकरी करी निजात्म-
जा गृहविमुक्त जैसा मयूर ही करी.

## अर्थ

म्हणोनि ही माझी साजरी स्तुतिरूप कन्या तु
ला मोठ्या प्रेमानें, अर्पण करितों. जरी ती गु
णवान् नाहीं, तरी हे पीतांबर धारण करणाऱ्या
देवा ती दुसऱ्या कोणाला वरीत नाही. म्हणून
हे हरी तूं हिला (माझ्या कन्येला) आपली दासी

कर. आणि आपल्या कन्येनें जो हा हट्ट घेतला आहे, त्यापासून तिला मुक्त करून मलाही तिच्या आग्रहापासून सोडीव.

कविता ३४ वी

अन्वय

कृतमं तुला स्मरोनी कवितावधू स्वीकृति नकराल तरी प्रभु आयका मी दुष्कृति खराच, आजि ती स्वीकृती नमस्कृति पुरःसर अर्पितों जाशिन मे: ःिरविसरवें तुम्हां सत्राजितीं दिली.

अर्थ

माझे केलेले अपराध स्मरून जर तुम्हीं कवितारूप नवरीचा अंगिकार करणार नाही, तर देवाधिदेवा ऐका. मी अपराधी तर खराच तथापि ज्याप्रमाणें सत्राजितानें नमस्कार करून आपली कन्या सत्राजिती (सत्यभामा) ही तुम्हास दिली त्याप्रमाणें आज मी तुला नमस्कार करून आपली स्तुतिरूप कन्या अर्पण करितों.

कविता ३५ वी

अन्वय

पिता खळ परंतु ती गुणवती सती चांगली म्हणोनि मज आपुल्या भजनि लावणे लागली, म्हणाल तरि जो भांडगा दांडगा तुम्हांसवें भिनवरात्र अहर्निशीं भांडला, तत्सुता कशी.

## अर्थ

बाप ज्यांबुवंत दुष्टखरा परंतु त्याची मुलगी जांबुवंती गुणवान होती म्हणून तिचा मला अंगिकार करावा लागला असें तुम्ही म्हणाल परंतु ज्या दांडग्या भांडखोर जांबुवंताने सत्तावीस दिवस पर्यंत युद्ध केलें त्याची मुलगी गुणवान कशी असेल.

## कविता ३८ वी

## अन्वय

तिलाही वरवी म्हणा, उचित होय तर्यी तापाकरें स्वंयेषाकरें यथारुचीस जली असेल अघेंव्यापिली धवें शापिली सतिशिलापरि असें नव्हे; हरिपदरजें जशी मनोहराकृति.

## अर्थ

ती रूपवती म्हणा योग्य आहे. कारण त्यावेळीं ती तुमच्या स्त्रियांकडून सुशोभित केली असेल म्हणून तिचा आपण अंगिकार केला परंतु पापाने व्यापिलेली आणि नोज्याने (गौतमऋषीनें) शापिलेली अशी जी अहिल्या शिळा होऊन पडली होती, तिला आपल्या पदाच्या रजानें सुंदर रूपवती स्त्री केली त्याप्रमाणें जांबुवंतीही झाली असेल.

## कविता ३७ वी

## अन्वय

समयीं भलें स्मरण झालें, दयासुधासीकरें करें कंसदासी समुज्वल कशी उजरली, तुम्हांस्वरि पुची घटिक तशी आवडे मत्कृति नको नसजवे असामी काय बहुत दुष्कृति.

अर्थ

बरें याच वेळीं स्मरण झालें. आपल्या दयाकू हातानें कंसदासीस (कुब्जेस) कसें नीट केलें. तुम्हास आपला रिपु (कंस) त्याची दासी (कुब्जा) कशी आवडली? माझी स्तुतिरूप कन्या तुम्हाला आवडत नाहीं, आणि तुमच्यानें ती नीट होत नाहीं. असामी काय मोठा अपराधी आहे. म्हणजे माझी कविता कांहीं व्यंग असल्यास तीं नीट करा आणि ती आपली प्रीतिपात्र करून घ्या.

## कविता ३८वी

### अन्वय

जसी पृथुक तंदुल प्रसृति आप्तकामा, तसी कृतिरुची तूं सभाग्य, सुनय आप्तकामा तसी, व साधु म्हणति विदुरमंदिरीं कण्या आस्वादिल्या जरी खरें आधुल्यास्वा तुज प्रमुसिं क शादिल्या.

अर्थ

ज्याप्रमाणें पोऱ्ह्यांच्या ओंजळीनें (सुदाम्याची) मनकामना पूर्ण झाली त्याप्रमाणें ही सा

झी स्तुति त्यापोथ्यां प्रमाणें तुम्हालाआवडो. तूं भाग्यवान असून साधुजनांचा मित्रआहेस. मगतूं आमचाच कां अव्हेर करशील. अर्थातक रणार नाहींस. आणखीं साधू असें म्हणतातकीं तुम्हीं एकदां विदुराच्या घरीं तुसल्या कण्याच भक्षण केल्या हें जर खरें असेल तर विदुराला त्या तुसल्या कण्या देववल्या तरी कशा! सारां श तुला जे कोणी प्रेमानें कांहीं अर्पण करिता- त त्यापासून तुला संतोष होतो.

कविता ३९ वी

अन्वय

जिणें रस पहावया प्राशिथिलीं रदींचाविलीं सुवा- सहीकळावया प्रथम नाशिकीं लाविलीं, तुम्हास शबरी तशीं जुनी बद्रिका फळें दे अशी कथाअ- सो तुझीं स्वचरितें मेजुनी पहा.

अर्थ

ज्याभिल्लिणीनें रसपाहण्याकरितां आपल्या बो टांनीं तीं बोरें चेपून मऊ केलीं, दांतांनी चाविलीं, सु वास कळण्याकरितां हुंगिलीं तुम्हाला त्या शबरी नें अशा प्रकारची फळें दिलीं अशीकथाआहे. अशीं तुम्हीं आपलीं चरित्रें मोजून पहा.

कविता ४० वी

अन्वय

प्रभो शरण आलियावरी कधीं वांकडे नव्हा म्ह
णोनी जीवांकडे इतुकेंच हें स्वहित कृत्य,प्रसा
द करितां पळ विलंब नसे,बापा खरें ; पारवें उ-
घडिल्याविना मुखीं घनांबु न पडे·

## अर्थ

देवा तुम्हाला शरण आल्यावर तुम्ही कधींही वां-
कडे होत नाहीं· म्हणून आम्हां मनुष्यांचें इतकेंच का
म कीं तुला शरण जावें· मग तुला आम्हावर अनुग्र
ह करण्याकरितां एक क्षणसुद्धां लागणार नाहीं·
देवा हें खरें आहे· चातकपक्षानें तोंड उघडिल्या
वांचून त्याच्या तोंडांत पावसाचा थेंब पडत नाहीं·
तें उघडिलेंच पाहिजे·

# शब्दकोश

| | |
|---|---|
| अमित | पुष्कळ, असंख्य. |
| अरि | चक्र. |
| असत् | दुष्ट मिथ्या, व्यर्थ. |
| अंतक | नाश करणारा. |
| अब्द | मेघ. |
| अन् | नाहीं. |
| अन्य | दुसरी. |
| अहि | साप. |
| अतर्क्य | तर्क करण्यास कठिण. |
| अज | ब्रम्हदेव. |
| अंड | अंडें. |
| अजांडशतकोटी | ब्रम्हांडाच्या शंभरकोटी |
| अघासुर | एक दैत्य. |
| अवकाश | जागा. |
| अलभ्य | मिळण्यास कठीण. |
| अखिल | सारें. |
| अलंकृतिमति | अलंकारयुक्त. |
| अपराध | अन्याय. |
| अर्पितां | देतां. |
| अघनिधी | पापसमुद्र. |
| अमल | स्वच्छ, शुभ्र. |
| अव्यय | नाश. |

| | | |
|---|---|---|
| अचल | ——— | पर्वत. |
| अजामिळ | ——— | नांवि. |
| अस्मि | ——— | आहे. |
| अपहें | ——— | हननानें. |
| अनृत | ——— | असत्य. |
| अदयना | ——— | निर्दयपणा. |
| अजी | ——— | अहो. |
| अनुज | ——— | बंधु. |
| अधिकार | ——— | पदव्या, सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता ह्या चार मुक्ति आहेत. |
| अमर | ——— | देव. |
| अधोगति | ——— | असद्गति. |
| अवश्य | ——— | हटकून. |
| अत्यादरें | ——— | मोठ्या प्रेमानें. |
| अगुण | ——— | दुर्गुण. |
| अहीरास | ——— | कुंभारास. |
| अवन | ——— | रक्षण. |
| अदंड | ——— | दंडरहीत, पंचेंद्रियें जिंकित नाहीं असा संसारी. |
| अनवद्या | ——— | स्तवनास योग्य. |
| अनाचर | ——— | आचरण्यास कठीण. |

| | |
|---|---|
| अमल | निर्मल, शुभ्र. |
| अवश्या | अपरिहार्य. |
| अहा | महाश्चर्य. |
| अनुभव | समज, समजूत. |
| असित | कृष्ण, काळें. |
| अभिदा | नाव, नाम. |
| अपटु | अकुशल, अज्ञानी. |
| अदयता | निष्ठुरपणा. |
| अभिष्ट | इच्छितमनोरथ. |
| असुर | दैत्य. |
| अमृत | मोक्ष. |
| अधिका | अधिकप्रिय |
| अगा | हें, अरे. |
| अणु | रजःकण. |
| अनर्घ्य | अमूल्यअशा. |
| अयुक्त | अयोग्य |
| अघ | पाप. |
| अभद्रा | कुरंग, टोणपा. |
| अब्ज | कमल. |
| असाधू | पापी |
| अपाय | अनहितकर्मे |
| अपथ्य | रुची. अपथ्यांवरआहेरुची |

| | |
|---|---|
| | ज्याची. |
| अतुला ——— | निरूपमा. |
| असि ——— | तलवार. |
| अतिथी ——— | याचक, भिकारी. |
| असा ——— | मजसारखा. |
| आस्पद ——— | स्थान, कारण. |
| आयस ——— | लोखंड. |
| आतर ——— | उतार. |
| अश्रमीचा ——— | आश्रमांतील. |
| आदरें ——— | आवडीनें. |
| आत्मजा ——— | मुलगी. |
| आग्रह ——— | हट्ट, हेका. |
| आपगा ——— | नदी. |
| आधार ——— | आश्रम. |
| आळ ——— | बालंट |
| आश्रित ——— | आश्रयकेलेला. |
| आगळा ——— | अधिक. |
| आमय ——— | रोग. |
| आकर ——— | खाण. |
| आप्त ——— | आत्मीय, प्राप्तकेलाआहे. |
| आस्वादिल्या ——— | चाखल्या. |
| आख्या ——— | नाम ज्याचें. |

| | | |
|---|---|---|
| आनत | ———— | मनोभावेंकरून. |
| आवडी | ———— | गोडी. |
| आटला | ———— | कमी, न्यून झाला. |
| आकळी | ———— | आकलन करिते. |
| आवली | ———— | रांग. |
| आहती | ———— | प्रहार, ताडन. |
| आयुर्बळें | ———— | आयुष्याच्याबळें. |
| आग्रही | ———— | हेकेखोर, आग्रहवान्. |
| आर्द्र | ———— | ओली. |
| आवरी | ———— | आंवरतो. |
| आत्मबोध. | ———— | आत्मज्ञान. |
| आंवरा | ———— | आटोपा. |
| इंदिरा | ———— | लक्ष्मी. |
| उबशील | ———— | कंटाळशील. |
| उद्धरण | ———— | उद्धार. |
| उरोज | ———— | स्तन |
| उग्र | ———— | भयंकर मोठा |
| उमोप | ———— | पुष्कळ. |
| उदर | ———— | पोट. |
| उथिता | ———— | उठलेली. |
| उदारपण | ———— | दातेपणा. |
| उजरली | ———— | नीट केली |

उपार्जनें ——— प्राप्तीनें
उणें ——— न्यून.
उक्ति ——— वाणि; भाषण.
उरग ——— सर्प.
उमज ——— कळणें.
उद्योग ——— धंदा.
उपेक्षण ——— उपेक्षा.
उदित ——— सांगितलेलें.
उक्तें ——— सांगितलेलीं.
उदधी ——— समुद्र.
उतरणे ——— पारनेणें.
ओपिसी ——— देतोस.
ओखद ——— औषध.
अंड ——— आंडें.
अंतक ——— नाशकरणारा.
अंबर ——— वस्त्र, आवरण.
अंबोद ——— मेघ.
अंबुज ——— कमल.
अंगना ——— स्त्री.
कलिमल ——— पाप.
कडे ——— कडेवर.
कटू ——— कडू.

| | |
|---|---|
| कली | कलियुग |
| कवीश्वर | व्यासवाल्मिकादि श्रेष्ठकवी |
| कर्दम | चिखल. |
| कवि | व्यासादिज्ञानी, पंडित. |
| कटक | सेना. |
| कनक | सुवर्ण. |
| कर | हात. |
| करुणा | दया. |
| कलंक | कालिमा, डाग. |
| कळवळोनि | कळवळा येऊन. |
| करुण स्वरें | दीन वाणीनें. |
| कंस | ना. वि. एक दैत्य. |
| कंसदासी | कुब्जा. |
| काम | इच्छा. |
| कामदा | इच्छिलेलें देणारा. |
| काक | कावळा. |
| कामुक | कामी. |
| काकवी | कच्चा गूळ. |
| काळजी | चिंता. |
| कामुक | स्त्रैण. |
| काय | देह, जसेंकाय. |
| कार्यलोभी | लोभाविष्ट. |

| | |
|---|---|
| कातरा ——— | भित्र्याला· |
| कायाधव ——— | कयाधूचापुत्रप्रल्हाद |
| कावली ——— | भासली· |
| कासार ——— | तलाव· |
| कारुण्यांबोध ——— | दयाघन· |
| काय ——— | केवढा· |
| कांवळी ——— | घोंगडी· |
| किटे ——— | मळे· |
| किलाल ——— | उदक· |
| किण ——— | क्षत,चिन्ह, घट्टा· |
| किंकरी ——— | दासी· |
| कुच ——— | स्तन· |
| कुमारक ——— | मुलगा· |
| कुशल ——— | पुण्यकारक, कल्याणकारक, कल्याण· |
| कू ——— | वाईट |
| कुलकज्जल ——— | कुलाचें काजळ· |
| कुचकुंभ ——— | मोठे स्तन· |
| कु ——— | पृथ्वी· |
| केवी ——— | कशी· |
| केकावली ——— | यांत केकाम्हणजे मोराचें ओरडणेंआणि आवली म्ह॰ |

| | |
|---|---|
| | समूह. |
| केवळ ——— | नुस्तें. |
| केका ——— | केकावलीरूप ग्रंथ. |
| कोटी ——— | कोट्यावधि. |
| कोडिगा ——— | कोडगा, निर्लज्य. |
| कोप ——— | क्रोध. |
| कृतांत ——— | यम. |
| कृतघ्न ——— | कृतोपकारनसमजणार. |
| कृपण ——— | हीन, चिकट. |
| कृप ——— | कृपावंत. |
| कृति ——— | चरित्र, कवितारूपकृति. |
| कृतार्थ ——— | मनोरथसिद्ध. |
| कृतज्ञता ——— | प्रत्युपकार बुद्धि. |
| खळ ——— | दुष्ट, कपटी. |
| खरी ——— | राक्षसी, गाढवी |
| खणिला ——— | खणून काढिला |
| खोटेपण ——— | खोटसाळपणा |
| गदा ——— | सोटा |
| गणोनि ——— | जाणुनी. |
| गमे ——— | वाटे. |
| गळो ——— | गळूनपडो. |
| गद ——— | रोग. |

| | | |
|---|---|---|
| गल्ल | ——— | गाल. |
| गायक | ——— | नाम गातो. |
| गाद | ——— | गा म्ह० गाणें. गाद हा शब्द क्रियाविशेषण आहे. |
| गुणी | ——— | गुणवती. |
| गरू | ——— | नारदादीऋषी, मुख्यआचार्य, आई. |
| गुरुभाव | ——— | आईपणा |
| गुणी | ——— | सद्गुणी. |
| गुरुक्त | ——— | चांगलें म्हटलें. |
| गेह | ——— | घर. |
| गोपिका | ——— | गोपाळांच्या बायका. |
| गंगाधर | ——— | महादेव. |
| घडी | ——— | घटका. |
| घनांबु | ——— | पावसाचे थेंब. |
| घातक | ——— | घात करणारा. |
| घातुकें | ——— | नाशकरणाऱ्यानें. |
| घोटितां | ——— | घोट घेत असतां. |
| चरित | ——— | कार्य, चमत्कार. |
| चतुर | ——— | कुशल. |
| चळो | ——— | चंचळ होवो. |
| चामर | ——— | चवरी. |

| | | |
|---|---|---|
| चावळे | ——— | धरला. |
| चुकी | ——— | दोष अपराध. |
| चुत | ——— | भ्रष्ट झाले. |
| चत्वर | ——— | आंगण. |
| चातक | ——— | पक्षी वि. |
| जय | ——— | धर्मराजा. |
| जनी | ——— | जन्म. |
| जठर | ——— | पोट. |
| जगविला | ——— | वांचविला. |
| जसातसा | ——— | कोणी करील तसा. |
| जननी | ——— | आई. |
| जरठ | ——— | वृद्ध म्हातारा. |
| जड | ——— | लोह काष्ट इ. जड पदार्थ. |
| जन | ——— | स. वि. वानर. |
| जपे | ——— | जपतसे. |
| जनक | ——— | पिता. |
| जगत | ——— | विश्व. |
| जन्मदा | ——— | आई. |
| जाणत्या | ——— | जाणणाऱ्याला, भूतवैद्याला. |
| जिरविले. | ——— | पचविले. |
| जीव | ——— | मनुष्य. |
| जीवा | ——— | जिवलगा. |

| | |
|---|---|
| जीवातु —— | संजीवनी मात्रा. |
| जेमनीं —— | जेवणांत. |
| झणी —— | पुनरपि, पुन्हा, लौकर. |
| झुरे —— | झुरतसे झुरते. |
| टोणपी —— | निर्लज्य, मूर्ख. |
| तर्पिता —— | संतुष्ट करता. |
| तट —— | भाग, प्रांत. |
| तम —— | आंधार. |
| तत् —— | त्याचें. |
| तनू —— | अंग, काया, देह, शरीर. |
| तत्रतिष्ठामि —— | तेथें उभा राहतों. |
| ताडन —— | मारणें. |
| तुळे —— | तुळणा पावते. |
| तुळ —— | तुळत असतां. |
| तैं —— | त्याकाळीं. |
| तंदुळ —— | दाणे. |
| तोष —— | संतोष. |
| तोक —— | बालक. |
| तृताप —— | आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक अशीं तीन प्रकारचीं दुःखें. |
| त्रिनव —— | सत्तावीस. |

| | |
|---|---|
| थिंट ——— | तोकडा, आंखूड. |
| दमार्थ ——— | दंडाकरितां. |
| दव ——— | वणवा. |
| दयासुधा ——— | कृपामृत. |
| दशमुख. ——— | रावण. |
| दशमुखानुज ——— | विभीषण. |
| दर ——— | शंका, शंख. |
| दक्ष ——— | नाम वि. हुशार, चतुर. |
| दडो ——— | दडुनराहो. |
| दव पावक ——— | दावाग्नि. |
| दावा ——— | भांडण. |
| दावानळ ——— | वणवा. |
| दारा ——— | आपली बायको. |
| दायाद ——— | आई. |
| दाथा ——— | उपमाला. |
| दाम ——— | दावें. |
| दास ——— | सेवक. |
| दुराग्रही ——— | हट्टवादी. |
| दुष्कृती ——— | दुष्टकामी, दोषी, अपराधी |
| दुहोत ——— | दुध काढोत. इष्टप्राप्तीक रून घेवोत. |
| दुरभिमान ——— | दुष्टाभिमान. |

| | |
|---|---|
| देवराचा ——— | दिराचा. |
| देवकी ——— | वसुदेवाची स्त्री. |
| दोष ——— | दूषण. |
| द्रव ——— | दया, ओलावा. |
| द्विज ——— | ब्राम्हण. |
| धर ——— | पर्वत. |
| धव ——— | नवरा. |
| धरा ——— | पृथ्वी. |
| धाम ——— | स्थान, वसतिस्थान. |
| धार्मिक ——— | उदार, दानशील. |
| धिक् ——— | धिःकारयुक्त. |
| धी ——— | मति. |
| धृत ——— | धारणकेलेलें. |
| धोपटणें ——— | मारणें. |
| ध्रुव ——— | उत्तानपातरायाचा मुलगा. |
| ध्वज ——— | निशाण, झेंडा. |
| नमस्कृति ——— | नमस्कार. |
| नमस्कृतिपरा ——— | जेकोणी नमस्कारकरितात त्यांना |
| नग ——— | पर्वत. |
| नय ——— | न्याय |
| नत ——— | नम्र. |

| | | |
|---|---|---|
| नमस्क्रया | —— | नमस्कार. |
| नव | —— | नूतन. |
| नर | —— | मनुष्य. |
| नत | —— | नांदवा. |
| नग | —— | अलंकार. |
| नच | —— | नाचणारा. |
| नदळो | —— | नहालो. |
| नर | —— | मानव. |
| नाविक | —— | नावाडी. |
| नायक | —— | नियंता. |
| नासिक | —— | नाक. |
| नानळो | —— | नलागो. |
| नांदणे | —— | राहणे. |
| निपट | —— | केवळ, अगदीं. |
| निगम | —— | वेद. |
| निलिंप | —— | देव. |
| निरारवितां | —— | नय. |
| निधि | —— | जग, नग, ब्रम्हदेव. |
| निज | —— | आपलें. |
| निष्ठूर | —— | निर्दय. |
| निवास | —— | आदीकरण. |
| निश्चय | —— | कार्ड्यमची बुद्धि. |

| | | |
|---|---|---|
| नीचतेस | ——— | हलकेपणास. |
| नृप | ——— | राजा. |
| पद | ——— | आधिष्ठान. |
| परिजन | ——— | सेवकजन. |
| पती | ——— | स्वामी. |
| पत्रावली | ——— | वेलबुट्टी. |
| परी | ——— | परंतु. तथापि,तरी. |
| पशू | ——— | कामधेनू. |
| परस्वा | ——— | परकीयवस्तु |
| परिशिलें | ——— | ऐकिलें. |
| पथ | ——— | मार्ग. धर्म. |
| पशुपदार | ——— | गोळ्यांच्या बायका. |
| परा | ——— | पहिला. |
| पराशरसुत | ——— | व्यास. |
| पट | ——— | वस्त्र |
| पटु | ——— | दक्ष, कुशल. |
| पशुपाळ. | ——— | नंद. |
| परतट | ——— | पार,पलीकडीलतड. |
| परिक्षक | ——— | सोनार,लोहार,इ. |
| पन्नग | ——— | सर्प |
| पचे | ——— | पचन होई. |
| पाप | ——— | दुष्कीर्तीरूप दोष, दोष. |

| | |
|---|---|
| पावणे ——— | रक्षण करणारे. |
| पामर ——— | दीन. |
| पाखरें ——— | पाखरानें. |
| पादप ——— | वृक्ष. |
| पाजितां ——— | स्तनपान देतां. |
| पारदा ——— | पार नेणाऱ्या, पार देणाऱ्या. |
| पारद ——— | पारा. |
| पामर ——— | दरिद्री. |
| पिता ——— | बाप, अ. जांबुवंत. |
| पिशाचिका ——— | डंकीण. |
| पिसा ——— | वेडा. |
| पीत ——— | पिवळें. |
| पुरःसर ——— | पूर्वक, अग्रगामिनी. |
| पिंगळा ——— | एक वेश्या होती. |
| पुस ——— | विचार. |
| पुराण ——— | भागवत. |
| पुरवील ——— | पूर्ण करील. |
| पुर ——— | त्रिपुरासुर. |
| पुरातन ——— | पूर्वींचा. |
| पुंडरीकामला ——— | पुंडरीक शुभ्र कमल. |
| पंडित ——— | भाविक. |
| प्रशमिन ——— | अत्यंत शमविले आहेत. |

प्रकृतिरंक ——— स्वाभाविक दरिद्री.
प्रजव ——— मोठावेग.
प्रणाम ——— प्रणामभूत.
प्रणत ——— नम्र
प्रत्यय ——— अनुभव.
प्रसृति ——— ओंजळ.
प्रभुत्व ——— स्वामीपणा, श्रेष्ठत्व.
प्रखर ——— तीव्र कठिण.
प्रबळ ——— अतिशय.
प्रभव ——— उत्पत्ति.
प्रकट ——— प्रत्यक्ष, स्पष्ट, उघड.
प्रसादपट ——— प्रसाद, प्रसन्नता,
पट ——— वस्त्र.
प्रपंच ——— संसार.
प्रसिद्ध ——— प्रख्यात.
प्रजापतीसुत ——— नारद.
प्रशिथिलीं ——— अगदीं दाबूनमऊ केलीं.
प्रजा ——— लोक, पुत्रादि.
प्राजापति ——— ब्रह्मा.
प्रबुद्ध ——— ज्ञानी.
प्रथम ——— पहिला.
प्रियतमा ——— आवडत्या, अत्यंतजिवलगा.

| | | |
|---|---|---|
| प्रिया | ——— | बायको, गंगा. |
| पृष्टी | ——— | पाठ. |
| पृथुक | ——— | पोहे. |
| बर्ही | ——— | मोर. |
| बटिक | ——— | दासी. |
| बरवी | ——— | चांगली. |
| बळी | ——— | बळवान. |
| बदरिकाफळें | ——— | बोरें. |
| बकी | ——— | पूतना, बगळी. |
| बळी | ——— | ना. वि. |
| बाधा | ——— | संकट. |
| बा | ——— | बाप. |
| बाहे | ——— | सांगतो, हांकामारितो. |
| बावरें | ——— | वेडें. |
| बुध | ——— | पंडित |
| बुळा | ——— | षंढ. |
| बोभाट | ——— | कागाळ्या. |
| बृहत् | ——— | स्थूल, मोठें, अत्यंत. |
| भवत | ——— | आपल्या तुमच्या. |
| भट | ——— | योद्धे. |
| भजे | ——— | भजला. |
| भव | ——— | प्रपंच. |

| | |
|---|---|
| भला | ज्ञानी अ· शाहाणा. |
| भली | पक्की, हुशार. |
| भवार्णव | संसाररूप समुद्र. |
| भजन | भक्ति. |
| भववन | संसाररूप अरण्य. |
| भद्र | कल्याणकर. |
| भजक | भजणारा. |
| भव | संसार. |
| भागवत | भगवत् भक्त. |
| भाव | भक्ति, श्रद्धा. |
| भाविक | भोळेजन, पुढलीं. |
| भाविकांला | प्रापंचिकाला, संसारीजनाला. |
| भावुक | भक्त. |
| भातुकें | भातुकली, खाऊ. |
| भांडगा | भांडखोर. |
| भिन्न | निराळा. |
| भी | भितो. |
| भुवन | त्रिभुवन. |
| भूदेव | ब्राम्हण. |
| भू | पृथ्वी, भुमी. |
| भंगो | तुटो. |

भ्रमे ——— फिर.
भृगु ——— ऋषी.
भेका ——— बेडुक.
महिमा ——— मोठेपणा.
मणी ——— रत्नें.
मर्त्य ——— सामान्यमनुष्य.
मनुजता ——— मनुष्यजन्म.
मलिन ——— काळें.
मनःपयोनिधि ——— मनरूपी समुद्र.
मख ——— यज्ञ.
मंद ——— अम्मल.
मर्द ——— पराक्रमी
मनोहराकृती ——— सुंदररूप आहे जिचें.
मद्य ——— दारू
महाजन ——— विद्वान
मदीय ——— माझें
महापंडीत ——— नारद
महेश्वर ——— शिव.
मनोरथ ——— इच्छा.
महा ——— मोठा.
मनोहर ——— सुंदर.
मयूर ——— मोर (कवीचें नाव.)

| | |
|---|---|
| मति ———— | शुद्ध |
| मही ———— | पृथ्वी· |
| मदन ———— | काम, मनोरथ· |
| मणि ———— | वीष शोषणारारवडा· |
| माजवी ———— | उन्मत्त करिते· |
| मातसी ———— | फुगशीलकाय· |
| मावरा ———— | लक्ष्मीवरा· |
| मा ———— | लक्ष्मी· |
| माया ———— | मोह· |
| माय ———— | आई· |
| मानस ———— | मन· |
| माना ———— | मान्य· |
| मारक ———— | नाशक· |
| मिरजे ———— | मिरवूनजाते· |
| मिरविली ———— | फिरविली· |
| मीन ———— | मासा· |
| मुका ———— | चुंबन· |
| मुनी ———— | तपस्वी· |
| मुरांतक ———— | विष्णु· |
| मुळीं ———— | आरंभीं· |
| मुत ———— | आनंत· |
| मेरू ———— | पर्वताचें नाव· |

| | |
|---|---|
| मोहरी ——— | राई |
| मोहिनी ——— | मोहविणारी एकस्त्री. विष्णूचें रूप. |
| मोहिला ——— | मोहून टाकिला. |
| मोहिती ——— | वश करिते. |
| मौक्तिक ——— | मोतीं. |
| मंदर ——— | मंदराचल. |
| मंडित ——— | अलंकृत, भूषीत. |
| मंतु ——— | अपराध. |
| यथामति ——— | ज्ञानाच्या शक्तिप्रमाणें. |
| यश ——— | कीर्ति. |
| यत् ——— | ज्यास, जिच्या. |
| यति ——— | संन्याशी. |
| यथेष्ट ——— | पाहिजे तितकें. |
| यशोरसे ——— | यशरूपरसानें. |
| यथार्थ ——— | सत्य. |
| यमुना ——— | ना. वि. |
| याचक ——— | गरीब, भिकारी. |
| यात ——— | यांत. |
| योगायन ——— | योग, मनाचें एकाग्रणीकरणरूप |
| योगमायाधव —— | योगमाया, मूलप्रकृति, ति- |

| | |
|---|---|
| | चाधव मुख्य. |
| रमा ———— | ना. वि. |
| रविसख ———— | सत्राजित. |
| रति ———— | क्रीडा. |
| रवि ———— | सूर्य. |
| रण ———— | युद्ध. |
| रत ———— | रममाण. |
| रज ———— | रजःकण. |
| रहस्य ———— | यथार्थ ज्ञान. |
| रसें ———— | दुधानें. |
| रत ———— | आसक्त. |
| रद ———— | दांत. |
| रसिक ———— | रसज्ञ. |
| रज ———— | धून. |
| रत्नाकर ———— | समुद्र, खाण. |
| रचितसें ———— | रचना करीतसें. |
| रासभी ———— | गाढवी. |
| राधिका ———— | ना. वि. |
| रानटाचा ———— | अरण्यवासी जनाचा |
| रिपु ———— | शत्रु. |
| रीति ———— | चाल. |
| रुचे ———— | आवडे. |

रुग्ण ——— रोगी.
रुंकु ——— एकजातीचें हरण.
लक्ष्मी ——— सहनशील.
लक्ष ——— लक्षावधि.
लया ——— मोक्षास.
ललाट ——— कपाळ.
लाघव ——— हलकेपणा.
लाथक्की ——— लाथामारते.
लीलालसें ——— लीला अलसें स्तब्द.
लीला ——— विलास.
लुब्धा ——— वाचाळ.
लोक. ——— आम्ह वरुण इंदादिकलोक.
वधी ——— मारिती झाली.
वर्ण ——— अक्षरें.
वर्णविलोम ——— बोलधितोस.
वरद ——— वर देणाऱ्या.
वत्सल ——— दयानिधे.
वधू ——— नवरी.
वराह ——— डुकर.
वदान्य ——— दाता.
वर ——— स्वीकार, नवरा.
वर्णीं ——— वर्णांच्याठांई.

वध ———— हनन.

वलय ——— वेढा.

वश ———— आपले स्वाधीनकरूनघेणें, स्वाधीन.

वल्लभ —— प्रिय.

वन ——— रान.

वरा ———— आशिर्वचनाला.

वदे ———— बोलली.

वधू ———— स्त्री.

वरी ———— वरून.

वरवल्लक —— श्रेष्ठ विणा.

वळा ———— वृष्टीकरा.

वशा ——— वारणी.

वदान्य———— वरद.

वर्णिती —— विलोकोनी.

वास ——— राहणे, वस्त्र.

वारिती —— दूरकरितात.

वारण ——— हत्ती.

वाखाणिला — स्तविला.

वासव ——— इंद्र.

वासना ——— इच्छा.

वाक् ——— वाणी.

| | |
|---|---|
| वानिनों ——— | स्तवितों. |
| वांकडें ——— | अनहितकारक. |
| वितृष्ण ——— | तहानरहित. |
| विकृति ——— | मनोविकार. |
| विमुक्त ——— | मोकळा. |
| विषस्तवन ——— | विषासारखी स्तुति. |
| विदित ——— | माहीत. |
| विषाद ——— | खेद, रोष. |
| विपाक ——— | परिणाम. |
| विविध ——— | नानाप्रकारचा. |
| विपत ——— | विपत्ति, संकट. |
| विलंब ——— | अवधी. |
| विश्वास ——— | एकनिष्ठभाव. |
| विहित ——— | योग्य. |
| विगतशंक ——— | निःशंक होत्साता. |
| विषय ——— | ऐहिकपदार्थ (द्रव्यादि) विषयभूत जाहली. |
| विशुद्ध ——— | शुद्ध, निर्मल |
| विषम ——— | भिन्न. |
| विश्वासनी ——— | विश्वास ठेविनात. |
| विश्वास ——— | जगास. |
| विरोचनात्मज ——— | विरोचनाचा पुत्र. |

विरोचन —— ना. वि.

विमोहिला —— भुलविला.

विटती —— कंटाळतात.

विलासिनीजन —— शृंगाररसजाणणाऱ्या.

विलोकून —— पाहून.

विटंल —— भासपावेल.

विधि —— ब्रम्हदेव.

विमुक्ति —— मोक्ष.

विषाद —— विकृति.

विश्व —— जगत्.

विनोद —— व्यसन.

विघ्न —— पीडा, निंदा.

विषय —— ऐहिक भोग्यपदार्थ.

विना —— शिवाय.

विंगळा —— व्यंग.

विंगळ —— अग्नि.

विटती —— विटतात. कंटाळतात.

वी —— वितो.

वंदिजे —— वंद्य होय.

वंदारुचे ५ —— वंदन करणाराचे, स्तुतिपाठ-
काचे.

व्यसन —— दुःख.

| | |
|---|---|
| व्यापिली ——— | भरली. |
| व्यंग ——— | कमी. |
| व्रजवधू ——— | गोपस्त्रिया. |
| व्रत ——— | नियम. |
| व्रज ——— | गोकुळ, तेथील लोक. |
| वृक ——— | लांडगा. |
| व्रज ——— | समुदाय. |
| व्रजवधू ——— | वत्सला. |
| वृथा ——— | व्यर्थ. |
| शलभ ——— | टोळ |
| शरणागती ——— | शरणागतभाव |
| शरदिंदु ——— | शरत्कालांतीलचांदणें |
| शर्करा ——— | साखर. |
| शरण्या ——— | निर्भयस्थानरक्षणक रणाऱ्या |
| शाश्वत ——— | निरंतर. |
| शांति ——— | शांतपणा. |
| शबरी ——— | ना. वि. एकाभिल्लीण |
| शोधिले ——— | शुद्धकेले. |
| शोचित ——— | शोककरिते. |
| शील ——— | स्वभाव. |
| शुक ——— | कृष्णद्वैपायनाचाशुकमुनी |

| | | |
|---|---|---|
| शैव | ——— | शिवोपासक |
| श्रवण | ——— | कान. |
| श्रम | ——— | दुःख. |
| श्रवण | ——— | ऐकणें |
| श्रितां | ——— | आश्रितां. |
| श्रीधर | ——— | विष्णू |
| स्व | ——— | आपलें. |
| स्वयोषा | ——— | आपली स्त्री. रुक्मिणी, लक्ष्मी. |
| स्वीकृती | ——— | अंगिकार. |
| स्वाद | ——— | मिष्ट |
| स्वपण | ——— | आपलीप्रतिज्ञा |
| स्ववरद | ——— | ज्यावरआपलें वरप्रदान झालें आहे. |
| स्वदास | ——— | हनुमान. |
| स्वयें | ——— | स्वतां. |
| स्वजन | ——— | भगवद्भक्त |
| समीहित | ——— | इष्ट, योग्य |
| सदाशिव | ——— | शिव, महादेव. |
| स | ——— | सह |
| सकाम | ——— | उत्सुकतेनें हौसेनें. |
| सदैव | ——— | सदोदीत. |

| | | |
|---|---|---|
| समजाविशी | —— | समजून. |
| सती | —— | पतिव्रता. |
| सद्यशोमुख | —— | सत्कीर्तिरूप मुख |
| सत्राजिती | —— | सत्यभामा. |
| समर्पि | —— | देतो. |
| समर्थ | —— | शक्तिमान. |
| सद्गुरु | —— | स्वामी, आचार्य. |
| सन्मुख | —— | पुढें. |
| सर्वसाक्षी | —— | सर्व पाहणारा. |
| सरुज | —— | रोगी |
| समृद्धि | —— | पाणि गवताची विपुलता. |
| समुज्वल | —— | फारस्वच्छ चांगली. |
| सजली | —— | शृंगारली. |
| सति | —— | साध्वी अहिल्या. |
| सभाग्य | —— | भाग्यवंत. |
| सत् | —— | चांगलें. |
| सत्था | —— | खरी. |
| सत्श्रुती | —— | साधूंचे कान. |
| सत्ता | —— | प्रभुत्व. |
| सदंड | —— | काठीनें. |
| सत्तम | —— | पुण्यशील. |
| सखी | —— | मैत्रीण. |

| | | |
|---|---|---|
| सदय | ——— | दयावंत. |
| सहज | ——— | स्वाभाविक. |
| समुद्धरसी | ——— | उद्धार करशील. |
| सर्वथा | ——— | कदापि. |
| सम | ——— | बरोबर. |
| समेत | ——— | लागलीच, बरोबर. |
| सकाम | ——— | उत्सुकतेनें होसेनें इच्छाधरून. |
| सदर्थ | ——— | खराअर्थ. |
| सहा | ——— | सहनकर. |
| साजिरी | ——— | वस्त्रभूषणानीं अलंकृतक-रून, गोजिरी. |
| साजिरें | ——— | चांगलें हितकारक. |
| साम्य | ——— | बरोबरी |
| साकडें | ——— | संकट. |
| साग्र | ——— | सारें. |
| सार | ——— | तत्व. |
| साचें | ——— | खरें. |
| सागर | ——— | समुद्र. |
| साबळें | ——— | भोळें बावळा. |
| सादरें | ——— | दयायुक्त अशा. |
| सार्थक | ——— | सफल. |
| सांवरी | ——— | रक्षणकरी |

| | | |
|---|---|---|
| सीकर | — | बारीकवर्षाव आहे जीपासून |
| सित | — | धवल शुभ्र. |
| सुता | — | कन्या. |
| सुदीन | — | अगदींगरीब. |
| सुपात्र | — | योग्य. |
| सुख | — | आनंद. |
| सुकर | — | करण्यास सोईवार. |
| सुरभी | — | कामधेनु. |
| कुमती | — | कोणी दुष्टस्त्री. |
| सुपथ | — | चांगलामार्ग. |
| सुकृत | — | पुण्य. |
| सुधा | — | अमृत. |
| सुर | — | देव. |
| सुधा | — | रस. |
| सु | — | चांगला. |
| सुकवी | — | व्यासवाल्मिकादि, काव्यकार |
| सुतत्व | — | पुत्रपणा. |
| सुरर्षि | — | नारद. |
| सुरपादप | — | कल्पतरू. |
| सुदुर्धर | — | धरण्यास अतिशय कठीण. |
| सुकर्णधार | — | सुकण्या. |
| सुखप्रद | — | सुखदेणारा. |

| | |
|---|---|
| दृढ | अत्यत बळकट· |
| ुपात्र· | वरदानास योग्य· |
| ुखवी· | सुखीकरिते· |
| ुदुस्तर | करण्यासकठीण |
| ु | फूल· |
| पद्रवा | उपद्रवयुक्त·भासलेला· |
| मल | एकप्रकारचें विष· |
| हारा | संहारकरा· |
| चित | पुण्य· |
| गर | युद्ध· |
| गम | एकत्रपणें· |
| गती | सोबती समागम· |
| र | काम |
| मरोनी· | मनांत आणून· |
| ादु | मिष्ट |
| भ्रमें | अत्यादराने,अतिलोकर· |
| कु | आपले आश्रितवगैरे |
| तव | स्तवन स्तुति· |
| धार | निश्चय |
| मरून | स्मरणकरून· |
| ्तुत | स्तविलें आहे· |
| नफल | पूर्ण· |

| | |
|---|---|
| सन्मुख ——— | प्रत्यक्ष. |
| सखा ——— | राम. |
| सकल ——— | सगळी. |
| हर ——— | शिव. |
| हचाला ——— | भलावण. |
| हरी ——— | नेते. |
| हरी ——— | देव भगवान |
| हावरा ——— | अधाशी, अतृप्त. |
| हा ——— | हायहाय. |
| हार ——— | अपजय, निर्भत्सना |
| हित ——— | कल्याण. |
| हीन ——— | रहीत. |
| हेम ——— | सोनें, सुवर्ण |
| हेतु ——— | कारणभूत आहे. |

समाप्त